पाटील बसतो.)

(बाबा सटका आपटतात. पाण्याची धार वर उसळते. छापी भिजवून चिलीम भरतात. चिमटा आपटतात. जळते निखारे बाहेर पडतात. चिलीम भरून झुरका घेतात. चांद पाटलाच्या हाती देत –)

बाबा: चल, चिलीम पिऊन घे बरं!

चांद पाटील: (आश्चर्यचकित होतो. आदरपूर्वक वंदन करतो.) मालिक, मी आपल्याला ओळखले नाही. आप परवरदिगार अल्ला हो. माफ करावे. मी आपला बंदा आहे. फकीरसाहब, दया करा. माझी घोडी मला मिळवून द्या.

बाबा: पाटील, अल्लामिया की याद करना. सारेकाही त्याच्या इच्छेने मिळते. सबकुछ अल्ला ही अल्ला है. त्या निवडुंगाच्या बेटामागे तुझी घोडी चरते आहे. जा, घेऊन ये तिला.

(पाटील जातो. निवडुंगामागे त्याला घोडी दिसते. तो तिला घेऊन येतो. कृतज्ञपणे बाबांच्या पायावर डोके ठेवतो.)

चांद पाटील: हे मालिक, अल्लामिया! आप खुदा से बिदा नहीं. आपण माझ्या गरीबाच्या घरी पायधूळ झाडावी. आपली पाक पावले माझ्या घराला लागावी. आपण मला येण्याचे वचन द्या. तोपर्यंत मी आपली ही पावले सोडणार नाही. माझ्या कुटुंबावरही आपण दया करावी. आपण माझ्या गावी रहावे.

बाबा: नाही, चांदभाई, मी आता यावेळी तुझ्या धूप खेड्याला येऊ शकत नाही. कारण मी शिरडीच्या दिशेने निघालो आहे. माझा हा मार्ग मला कदापिही बदलता येणार नाही. पण मी शिरडी येथे स्थिरावण्यापूर्वी तुझ्या धूपगावी एकवार अवश्य येऊन जाईन.

चांद पाटील: बाबा, ही फार मोठी मेहेरबानी आहे. मी आता आपला निरोप घेतो. मी त्या भाग्यशाली दिवसाची वाट पाहीन.

बाबा: अल्ला भला करेगा. भगवंत तुझ्यावर मेहरनजर ठेवील.

(बाबांच्या कृपेने मिळालेल्या घोडीसह चांद पाटील आपल्या गावाच्या दिशेने जातो.)

१८५८ मध्ये श्री बाबा औरंगाबादजवळील या स्थळाकडून मार्गस्थ झाले. यापूर्वी १८५१ ते १८५८ पर्यंत ते अनेक ठिकाणी फिरले. बाबा हिमालयातील चक्रतीर्थलाही गेले होते, असे पाथरीचे रहिवाशी सांगतात. बाबा १८५१ ते १८५८ पर्यंत अनेक धर्मस्थळी गेले व १८५८ च्या सुमारास ते धूपखेड्यास गेले व चांद पाटलाच्या भावाच्या पुत्राच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर शिरडीच्या गांवकुसावर हजर झाले. चांद पाटील याची भेट हे बाबांच्या अज्ञातवासातील पहिले ज्ञात दर्शन असल्याने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. स्वामी समर्थ जसे खंडोबाजवळ अक्कलकोटात १८५६ मध्ये प्रगट झाले तसे बाबा १८५८ मध्ये गांवकुसावरील गाडीतळावरून हळूहळू खंडोबाच्या मंदिराकडे चालत गेले. तेथे त्यांचा भावी भक्त म्हाळसापती त्यांना प्रथम भेटला.

**सौभाग्य दारी आले – शतजन्म सफल झाले**
**शिरडीस साई आले – शिरडीस साई आले**

(साई गीतायन)

(पृष्ठ क्र. ४४ वरून)

तो निवारण्यासाठीं त्यांनीं ब्रह्मांडी प्राण चढवून समाधि लावण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं सर्वांना सांगितले की आजपासून तीन दिवस मला जागें करूं नका आणि मी न उठलों तर, त्या जागी (सभामंडपाच्या कोपऱ्याकडे ठिकाण दाखवून) समाधि खोदून मला ठेवून द्या. म्हाळसापतींकडे वळून त्यांना त्यांनीं निक्षून सांगितलें कीं, तीन दिवस माझी उपेक्षा करूं नकोस. यानंतर हल्लीं ज्या ठिकाणीं जातें आहे, त्या ठिकाणीं बाबा रात्रौ १० च्या सुमारास अचेतन होऊन म्हाळसापतींच्या मांडीवर पडलें. श्वास आणि नाडी बंद झाली. सर्वांनी बाबांची आशा सोडली. पाटील कुलकर्ण्यांनी पंचनामा केला आणि लोक समाधि देण्याच्या तयारीस लागले; पण म्हाळसापतींनी आशा सोडली नाहीं, "मग पुढें म्हाळसापती। अहोरात्र सावधवृत्ती। साईबाबांलागी जपती। तैसेच बैसती जागत॥" (श्री साईसच्चरित, अ. ४४-७२) पुढें तीन दिवसांनीं पहाटे तीन वाजतां चेतना येऊं लागली, श्वासोच्छ्वास सुरू झाला, डोळे उघडले, पोट हालूं लागलें, शरीराला आळेपिळे दिले गेले, आणि बाबा पूर्ववत् सचेतन झाले आणि सर्व भक्त आश्चर्यचकित आणि प्रसन्नवदन झाले. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, भगत् म्हाळसापती आज्ञापालनीं चुकले असते तर फार मोठा कठीण प्रसंग ओढवला असता.

"लोकोपकार हेंचि कारण। करूनि समाधींचें विसर्जन॥ साईं पावते झाले उत्थान। समाधान भक्तजनां॥ (श्री साईसच्चरित, अ. ४४-९१)

धन्य श्री साईबाबा आणि धन्य त्यांचा निस्सीम, निकटवर्ति, अनन्य आणि विरक्त भगत् म्हाळसापती!

# देह आमुचा पंढरी। श्वास झाले वारकरी।।

-श्री. रामकृष्ण गवंडे
माटुंगा (पश्चिम), मुंबई.

अध्यात्माची जीवनाला अतिशय गरज आहे. स्वामी अरविंद म्हणतात-युद्धभूमीवरही साधना करता आली पाहिजे. तसे पाहिले तर श्रीमद्भगवद्गीता युद्धभूमीवरच सांगितली गेली आहे. आजचे आपले जीवन हे धकाधकीचे बनले आहे. आपण मनाची शांती गमावून बसलो आहोत. ही शांती अध्यात्मानेच पुन्हा प्राप्त होऊ शकेल. चोवीस तासांच्या घाईगडबडीत क्षण-अर्धा क्षण का होईना, जर आपण अध्यात्माला देऊ शकलो तर आपल्या जीवनाचे सार्थक होईल.

आजचे युग हे विज्ञानयुग आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचतत्वांतून समग्र विश्वाची उत्पत्ती झालेली आहे. हे जरी खरे असले, तरी विज्ञान ही महाशक्ती आहे. विज्ञानामागे माणसाची बुद्धी काम करीत असते. या महाशक्तीचा उपयोग जसा लोकोपयोगी आणि कल्याणकारी कार्यासाठी होऊ शकतो, तसाच विध्वंसासाठीही तिचा उपयोग केला जाऊ शकतो. बुद्धीवर चांगले संस्कार केले गेले तर मनावर चांगले संस्कार सहज घडतील.

श्रीमद्भगवद्गीता हा विलक्षण स्वरुपाचा ग्रंथ असून वेद आणि उपनिषदे यांचे तो सार आहे. गीतेमध्ये कर्म, भक्ती, ज्ञान असे अनेक योग सांगितले आहेत. साधा व्यवहार करतानासुद्धा गीतेच्या शिकवणुकीचा उपयोग करावा. रामकृष्ण परमहंस म्हणतात- 'गीता-गीता' असे म्हणण्याऐवजी अगदी 'तागी-तागी' असे म्हणालात तरी तुमचे जीवन सफल होईल. स्वार्थ, हेवेदावे, भांडणे यांनी सारा प्रपंच भरलेला आहे. असे असले तरीही प्रेमात आणि त्यागातच परमार्थ आहे. कोणतीही गोष्ट प्रेमाने अधिक सुलभ होते.

परमार्थ म्हणजे परम अर्थ. तो परम अर्थ जीवनात समजून घेतला पाहिजे. मी कशासाठी जन्माला आलो? मनुष्य म्हणून मी जन्माला आलो आहे, तर मला मिळालेल्या बुद्धीचा माझ्याकडून योग्य वापर झाला पाहिजे. तरच तो परमार्थ होईल. प्रपंचात राहूनसुद्धा परमार्थामुळे प्रपंचातील दोष हळूहळू कमी होतात. म्हणून परमार्थ सोडायचा नाही.

सुख आणि दुःख प्रत्येकाच्या वाटचाला येतातच. कोणीही पूर्ण सुखी नसतो आणि कोणीही पूर्ण दुःखी नसतो. मोटार उडविणारा माणूस सुखी असतोच असे नाही. त्याची ती मोटार, त्याचा तो बंगला, त्याचे ते सारे वैभव आपणाला दिसते म्हणून तो सुखी आहे अशी कल्पना करू नका. दुःखी दिसणारा माणूसही सुखी असू शकतो.

दुःखे शारीरिक आणि मानसिक अशी दोन प्रकारची असतात. शरीराला वेदना होणे, ताप येणे, मार लागणे ही शारीरिक दुःखे आणि मनाविरुद्ध गोष्टी घडणे, कोणी टोचून बोलणे, अपमान करणे, हवी ती गोष्ट न मिळणे-ही मानसिक दुःखे होत. काही लोकांना दुसऱ्यांना खाऊ घालण्यात आणि समाधानी झालेले पाहण्यात सुख लाभते. आजारी माणूससुद्धा न भेटणारा माणूस त्याला भेटायला आलेला पाहून आनंदीत होतो. काही वेळ का होईना त्याला त्याच्या दुःखाचा विसर पडतो.

**पापपुण्य करुनि जन्मा येतो प्राणी।** असे तुकोबाराय म्हणतात- पूर्वजन्मी मी पाप केले असेल त्याचे फळ म्हणून या जन्मी मी दुःख भोगत आहे. प्रत्येक जीवाच्या वाटचाला सुख येते तसेच दुःखही येत असते. जगात पूर्ण सुखी कोणी नाही आणि पूर्ण दुःखीही कोणी नाही. समाजजीवनाच्या विरोधात परमार्थ कधीही येत नाही. ज्या कर्माला धरून माझे जीवन चाललेले असते, त्या कर्माने मी माझी सुधारणा घडवून आणतो. मी सुधारलो म्हणजे प्रत्येक व्यक्ती सुधारते. प्रत्येक व्यक्ती सुधारली म्हणजे समाज..... अशा तऱ्हेने राष्ट्र सुधारते. पंढरपूरच्या देवळात जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेण्याची आवश्यकता आहे असे नाही. देवळाच्या कळसाचे दर्शन घेतले तरी त्या पांडुरंगाचे दर्शन घेतल्यासारखेच आहे.

सर्व ठिकाणी असलेला पांडुरंग आणि माझ्या अंतःकरणातील पांडुरंग माझ्या अनुभूतीत आला पाहिजे. प्राणाबरोबर जी माझ्यात प्राणशक्ती आहे-ती हा श्वास. दिवसाच्या चोवीस तासांत आपण २१६०० वेळा श्वास घेतो. हे श्वास म्हणजे पंढरपूरचे वारकरीच होत. त्या प्रत्येक श्वासाबरोबर आपणाला पंढरीच्या त्या पांडुरंगाचे दर्शन घडले पाहिजे. पण त्यासाठी तशी मनाची तयारी केली पाहिजे. संत म्हणतात- **देह आमुचा पंढरी। श्वास झाले वारकरी।।**

# प्रसिद्ध कीर्तनकार आणि प्रवचनकार
# वै. प. पू. श. वा. दांडेकर यांचे मननीय बोल

संकलन – सौ. नलिनी आंबेकर
डोंबिवली (पूर्व), ठाणे.

* आपण जे जे काही पाहतो, ते ते सर्व देवांचे दर्शन होय! प्रभुशिवाय दुसरे दर्शनच नाही.

* लाटेची उत्पत्ती, स्थिती आणि लय हे सर्वकाही समुद्रातच असते. त्याचप्रमाणे जीवाची उत्पत्ती, स्थिती आणि लय ईश्वरातच आहे.

* जीव आत्मज्ञानाने शुद्ध होतो, ब्रह्मरुपतेपर्यंत वाढतो. त्याची शेवटची गती म्हणजे पाप-पुण्यातीत ब्रह्मस्थिती होय!

* विस्तवाला वाळवी लागत नाही, तसा आत्म्याला संसारसंबंध असत नाही.

* माणसाला दुःख झाले असताना जे वाटते, ते दुःख नसताना वाटले तरच विवेक जागृत राहील.

* ज्ञान व भावना यांच्यात बदल होत नाही, तोपर्यंत मनुष्याच्या क्रियेत रुपांतर होणार नाही.

* सतत कर्म निर्माण करून अस्वस्थ करणारी वासना केवळ ज्ञानानेच मरते.

* देवाशी तादात्म्य करून असणारी वृत्ती आनंदाच्या अनुभवात मुरून गेल्यावर हे शरीर कोठे आहे त्याची आठवणही रहात नाही.

* आपले कर्म चोख करून आपल्या कल्याणाचा मार्ग आपल्याला गाठता येईल.

* आपल्या वाट्याला आलेले कर्म 'ईश्वराची सेवा' या बुद्धीने करणे, हे मनःशुद्धीचे फार मोठे साधन आहे.

* भ्रमाला कारण द्वैत आहे. अद्वैतानुभवात निर्भयता प्रतीत होते व निर्भयतेने जीव पूर्णत्वाला प्राप्त होतो.

* ज्या द्वैताच्या खंडनात ईश्वरदर्शन घडते, ते द्वैत कोठे बाहेर नाही, आपल्यातच आहे. ते एकदा गेले की भगवत् दर्शन दूर नाही.

* आत्मसुखाच्या ठिकाणी जो नित्य रत असतो, त्याला आत्मसुखाचेच नित्य दर्शन घडते.

* जितकी जितकी विषयासक्ती, तितकी तितकी चंचलता व दुःख आणि जितका विषयापासून सुटलेला व आत्मस्वरूपात रंगलेला, तितका सुखी.

* भगवंताचे नाम कर्माला सांग करते. कर्माला नेता येत नाही तेथपर्यंत पोहोचविते. बुद्धी, त्याग, सामर्थ्य सारेकाही एका भगवंताच्या नामात आहे. म्हणूनच कोणत्याही कर्माच्या शेवटी आपल्याकडे 'ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु' म्हटले जाते.

* भक्तीचा उदय झाल्याची कसोटी म्हणजे आपल्यातील वासना किती कमी झाल्या, त्याचा शोध घेणे होय!

* प्रपंच-प्रेमाची जागा भगवत्-प्रेमाने घेण्यासाठी 'विवेकासहित वैराग्याचे बळ' हवे. तरच ते होईल. नुसता बाह्य-संन्यास घेऊन ते होणार नाही.

* परमार्थ म्हणजे मानवी जीवनातील एक उत्कृष्ट भाग. जीवदशेला तोडणारे अमोघ शस्त्र म्हणजे परमार्थ होय!

* मनुष्य म्हणजे नुसते ज्ञान नव्हे, नुसती क्रियाही नव्हे, तर ज्ञानजन्य उत्कृष्ट क्रिया म्हणजे मानव.

* आजचा गुन्हेगार कायमचाच गुन्हेगार असेल, असे नाही. तो सुधारुही शकेल.

* प्रपंच्याकडे साधूच्या दृष्टीने पहायला शिका.

* जगत् म्हणजे ईश्वराने दाखविलेली सर्कस होय!

* माणसात शक्ती आहे. तिचा उपयोग लोकांसाठी करण्याची कळकळ नसेल, तर ती शक्ती असूनही नसल्यासारखीच आहे.

* नुसती विषयांची निंदा करून विषय सुटणार नाहीत. वाईट विषयापासून सुटण्यासाठी दुसरे काही चांगले छंद लावून घ्यावे लागतात.

* ज्याचे वर्तन शुद्ध आहे, शील उत्कृष्ट आहे, तोच खरा निर्भय होतो. शुद्धाचरणाने निर्भयता येते.

* आपल्याला मिळालेला पैसा देवाच्या सत्तेने आलेला असतो, देवाने दिलेला असतो. तो केवळ आपल्यासाठी नाही. म्हणून परोपकार जरूर करावा.

* आपले मन मारावयाचे आणि दुसऱ्याच्या मनाप्रमाणे करावयाचे, हे बहुत कठीण काम आहे. सेवा-धर्माचे हेच प्रमुख तत्त्व आहे.

(पृष्ठ क्र. ५५ वर)

# श्री क्षेत्र तुंगारेश्वर महादेव

-डॉ. यशवंत केवळे
मुलुंड (पूर्व), मुंबई.



भगवान शंकर भोलेनाथ म्हणजे हिमालयातील अत्यंत दुर्गम अशा कैलास पर्वतावरून साऱ्या पृथ्वीवरील मर्त्य जीवांची काळजी वाहणारे कडक दैवत! हिमालय हे मध्यवर्ती कार्यालय म्हणून दुर्गम ठिकाणी असणे ठीक आहे, परंतु इतरत्रही त्याने आपले वास्तव्य अशाच दुर्गम ठिकाणी ठेवायलाच हवे का! आता हेच पाहा ना, मुंबईपासून हाकेच्या अंतरावर वसईजवळ सह्याद्रीच्या रांगेत असलेले श्री तुंगारेश्वर महादेव क्षेत्र. तेही असेच दीडेक हजार फूट उंचीवर अत्यंत घनदाट वृक्षराजीत वसलेले. हां, पण हे क्षेत्र मात्र नामी व निसर्गरम्य आहे. मुंबईच्या निसर्गप्रेमी व आबालवृद्ध भाविकांचे विशेषत: गुजराथी बांधवांचे हे अत्यंत आवडते ठिकाण आहे. त्या ठिकाणचा हा परिचय :

एका शांत सकाळी विशेषकरून पावसाळ्यात पाठीवर एकावेळच्या दशम्या बांधून पश्चिम रेल्वेच्या लोकलने वसई-रोड स्थानकावर उतरावे. तेथून एस्.टी. बसने तुंगारेश्वर-फाट्यापर्यंत जाता येते किंवा ठाण्याहून अर्नाळ्याकडे जाणाऱ्या कोणत्याही एस्.टी. बसने येथवर येता येते. स्वत:चे वाहन असेल तर उत्तमच. या फाट्यापासून प्रत्यक्ष देवस्थान साडेतीन कि.मी. दूर आहे. आत एक कि.मी. पर्यंत डांबरी सडक असून टोकाला वाहने ठेवता येतात. संपूर्ण रस्ता दहा फूट रुंदीचा असून पुढचा रस्ता कच्चा आहे.

पावसाळ्याच्या दिवसांत रस्त्याच्या दुतर्फा दूरवर भातशेतीच्या हिरव्यागार गालिच्याची लव हवेच्या हळूवार झुळकीने सळसळत असते. शेतात साचलेल्या पाण्यात उंच डोंगराचे प्रतिबिंब उमटलेले असते. मधूनच पावसाची सर शिडकावा करून चिंब भिजवून जाते. समोर हिरव्यागार गर्द वृक्षराजीने सुशोभित, मस्तकी पांढऱ्या शुभ्र ढगांचा शेला धारण केलेले डोंगर खुणवीत असतात. संपूर्ण रस्ता दुतर्फा गर्द झाडीने शाकारलेला आहे. मधूनच निर्झराचे झुळझुळ गाणे कानावर पडते. दूर उंच झाडावर एखाद्या पक्षाचा कर्णमधुर आवाज लक्ष वेधून घेतो. एखादा सुंदर पक्षी मधूनच दर्शन देतो. वाट चालताना चार ठिकाणी एकच ओढा पुन्हा पुन्हा ओलांडावा लागतो.

या ओढ्यात अनेक हौशी पर्यटक डुंबण्याचा आनंद लुटत असतात. सुरुवातीला दोन वेळा ओढा ओलांडल्यानंतर

रस्त्याच्या डावीकडे शेषनाग देवतेचे छोटेखानी सुरेख मंदिर लागते. गर्द झाडीत लपलेल्या या मंदिराला थोडी वाट वाकडी करून आवर्जून भेट द्यावी. थोडी विश्रांती घेऊन नव्या उमेदीने पुन्हा चालायला सुरुवात करावी. वाट फारशी अवघड वा दमछाक करणारी नाही. अर्ध्या तासात आपण मुख्य मंदिराजवळ पोहोचतो. परंतु जवळ जाईपर्यंत मंदिराच्या अस्तित्त्वाची चाहूल लागत नाही. छोटेसे वळण संपताच समोर सखल भागात प्रशस्त मंडप असलेले मंदिर दृष्टीस पडते. घंटानादामुळे आसमंत दुमदुमत असतो.

मंदिराच्या प्रांगणात थोडासा विसावा घ्यावा. जवळच बंदिस्त विहीर असून त्यावर रहाट बसविला आहे. बाजूने ओढा खळाळत वहात असतो. येथे हातपाय धुवून मग तुंगारेश्वराचे दर्शन घ्यावे. मंदिर तसे फार पुरातन नाही. गाभारा खोल असून विस्तृत स्वयंभू शिवलिंग आहे. वर चांदीचा नागफणा असून पाण्याच्या अभिषेकाची धार सतत चालू असते. वर सुंदर घुमट आहे. समोर प्रशस्त संगमरवरी फरशी असलेला मंडप आहे. मंडपात नंदी आहे. मंदिराच्या मागच्या बाजूला भाविकांसाठी पत्र्याची शेड बनविलेली आहे. मंदिराच्या प्रांगणात हनुमानमंदिर, काळभैरव मंदिर, समोरच पादुका व डावीकडे ओढ्याच्या पलीकडे जगमातेचे सुंदर मंदिर आहे. येथेच बारमाही स्वच्छ व थंड पाणी वाहणारे गोमुखही आहे.

या देवस्थानाविषयी निश्चित अशी फारशी माहिती उपलब्ध नाही. सद्याच्या देवस्थानच्या व्यवस्थापकांकडून जी थोडीबहुत दंतकथा ऐकावयास मिळाली, ती अशी :

विमलासूर नावाचा राक्षस हा भगवान शंकराचा परमभक्त होता. त्याची इच्छा होती की शंकराच्या हातून आपला अंत व्हावा. परंतु आपल्या भक्ताची ही विचित्र मागणी शंकराला पूर्ण करणे कठीण होते. शेवटी विमलासूराने देवदेवतांना छळायला सुरुवात केली. निदान त्यामुळे चिडून तरी भगवान आपणास मारतील, ही त्याची अपेक्षा.

त्रस्त झालेले देव शंकराकडे गेले. विमलासूराच्या त्रासातून मुक्त करण्याविषयी त्यांना साकडे घातले. शेवटी परशुरामाचा अवतार धारण करून शंकराने विमलासूराचा वध केला.

श्री तुंगारेश्वराची दरवर्षी महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. श्रावणी सोमवारी भाविकांची रीघ असते, तर रविवारी व सुट्टीच्या दिवशी हौशी पर्यटकांची गर्दी उसळते.

मंदिराच्या आवारात देवस्थानद्वारा भाविकांच्या निवासासाठी आठ खोल्या बांधलेल्या असून त्यासाठी नाममात्र भाडे आकारले जाते. जेवणाची सोय मात्र येथे उपलब्ध नाही. परंतु स्वत:चा शिधा असेल तर भांडी, शेगडी व सरपण भोजन तयार करण्यासाठी मिळते.

मंदिराच्या पुढे फर्लांगभर अंतरावर खडकातून ओढा उडच्या घेत असतो. अनेक हौशी आबालवृद्ध यामध्ये मनसोक्त डुंबत असतात. ज्यांना निसर्गाची ओढ आहे, मनसोक्त हिंडण्याची आवड आहे त्यांच्यासाठी या ठिकाणी सर्वकाही आहे. निसर्गाचे हे मन उल्हसित करणारे रूप पाहून चित्तवृत्ती प्रफुल्लीत होतात. कुणाही सामान्य कुवतीच्या पर्यटकास अगदी सहज जाता येईल, असे हे ठिकाण आहे. येथून पुढे साडेसात कि.मी. अंतरावर सदानंद महाराजांचा आश्रम आहे. तेथून जवळच परशुरामकुंड आहे. इच्छाशक्तीच्या जोरावरच तिथपर्यंत पोहोचता येते. अवश्य भेट द्यावी असेच हे निसर्गरम्य क्षेत्र आहे. अर्थात कुठलाही मौसम वर्ज्य नाही. परंतु पावसाळी मौसमाला विशेष प्राधान्य द्यावे.

**कैलासराणा शिवचंद्रमौळी।**
**फणींद्र माथा मुकुटी झळाळी।**
**कारुण्यसिंधु भवदु:खहारी।**
**तुजवीण शंभो मज कोण तारी।**

---

(पृष्ठ क्र. ५३ वरून)

* केवळ ज्ञानमय स्थिती म्हणजेच खरी शांती.

* गुण कमी असोत वा दोष अधिक असोत, संत साधकाला आश्रय देणारच.

* नुसते लोक जमा करणे, हा लोकसंग्रह नव्हे; तर उन्मत्तांनाही नीट मार्गावर आणणे, हा खरा लोकसंग्रह.

* बर्फाजवळ गेलो की गारवा मिळतो, त्याप्रमाणे महात्म्यांच्या सान्निध्यात आनंद प्राप्त होतो.

* सूर्याच्या समोर अंधार येणे शक्य नाही. त्याप्रमाणे ज्याच्या अंत:करणात भगवंताची मूर्ती स्थिर झाली, त्याला अशुभ कोठेच नाही.

* सत्संगाने पवित्रता येते. पापाची बुद्धी उरत नाही. पापाचे बीज, कामक्रोधादी सारे नष्ट पावतात.

* जो ब्रह्मरूप झाला, त्याची वृत्ती बिघडत नाही. असे होणे हेच मानवी जीवनाचे स्वारस्य आहे.

* शरीराचे ममत्व कमी होईल अशी क्रिया करणे, त्याला तप म्हणतात.

* विषयानुकूल वृत्ती निर्माण होणे, म्हणजेच इच्छा.

* ज्ञानमार्ग म्हणजे डोंगराळ रस्ता आणि भक्तिपंथ म्हणजे सडकेची वाट.

* शुद्धचर्या हीच खरी संतपूजा होय!

* ज्याला परमार्थ साधावयाचा, त्याने देवावर सर्वस्वी भार टाकावा, त्याचेच सहाय्य घ्यावे.

---

# श्री साईंचे सत्य चरित्र–अध्याय १५वा

सटीक गद्य अनुवाद:
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

## "चोळकर शर्कर-आख्यानं"

(चोळकरांच्या खडीसाखरेच्या नवसाची कहाणी)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरूमहाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरू साईनाथांना नमस्कार असो.

ज्यांची अनंत (अमर्याद) पुण्ये फळाला आली असतील त्यांनाच साईंच्या दर्शनाचा लाभ मिळतो. मग त्यांना तिन्ही प्रकारची दुःखे (आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक) त्रास देत नाहीत (न बाधे) आणि परमार्थ प्राप्त करण्याचे साधन हाती येते. श्रोतेजनहो! कृपा करा आणि एक क्षण गुरूंचे ध्यान करून कथेकडे आदरपूर्वक मन लावून माझ्याकडे लक्ष (अवधान) द्या. "तुम्ही (येथे कथा सांगत) आहात, हे आम्हाला ठाऊक आहे. उगाच त्रास (परिश्रम) का घेता?" असे म्हणू नका व मला क्षमा करा. श्रोतेहो! तुम्ही सागरासारखे (उपमा) आहात. तो जरी काठोकाठ (अपरंपार) भरला तरी नद्यांना (सरिते) कधी परत पाठवित नाही आणि ढगांनी (घन) पाडलेल्या पावसाच्या हजारो सरींनाही (सहस्रधार) थारा देतो. तसेच तुम्ही श्रोतेजन सज्जन (संत) आहात. तुम्हामध्ये स्नान (मज्जन) करावे (तुमचा सहवास जोडावा), अशी मी इच्छा धरली आहे. माझा धिक्कार (तर्जन) करू नका. दीनदुबळ्यांना टाकून देणे बरे नव्हे. गंगानदीचे शुद्ध व पवित्र पाणी (जल) येवो किंवा गावातील गटाराचा प्रवाह (लेंड+आहोळ) येवो, सागराच्या पोटात दोघांनाही संगमाच्या वेळी जोराने उसळल्याशिवाय किंवा मन संतापाने भडकल्याशिवाय (खळबळ+विरहित) जागा असते. म्हणून तुम्हा श्रोत्यांच्या चित्तांना संतकथा ऐकण्याबद्दल जी उत्सुकता (आस्था) आहे तिचे समाधान (साफल्यता) माझ्याकडे कृपेने पाहिल्यावर आपोआप होईल. घाई न करता (सबुरी) व श्रद्धायुक्त होऊन या कथारूपी अमृताचे आदरपूर्वक सेवन केले तर श्रोत्यांना प्रेमयुक्त (युत) भक्ती लाभेल (आतुडेल) आणि ते कृतार्थ होतील, भक्तांना अतिशय श्रेष्ठ (परम) वस्तूची, म्हणजे परमेश्वराची सहज प्राप्ती होईल. श्रोत्यांना भक्ती आणि मुक्ती दोन्ही लाभतील, भोळ्या-भाबड्यांना सुखशांती मिळेल आणि सगळ्यांना आपल्या आश्रयाचे स्थान (निज+विश्रांति) सापडेल. गुरुमहाराजांच्या तोंडच्या ह्या गोड कथा ऐकून संसारातील भीती आणि पीडा (भव+भय+व्यथा) नाहीशा होतील, श्रोत्यांच्या मनाला आनंद वाटेल आणि आपल्या आत्म्याशी एकरूपता (निज+आत्मता) प्रगट होईल. (ओ. १-१०)

या अध्यायात एका प्रेमळ भक्ताने साईबाबांना कशी प्रार्थना केली व दर्शन देऊन बाबा त्याच्यावर कसे प्रसन्न झाले, हे ऐका. नुकतीच पाजून बाहेर गेलेली मांजर (मार्जारी) पुन्हा परत आली की तिची पिल्ले (पोरें) पुन्हा पुन्हा (फिरफिरोनि) प्रेमभराने प्यायला (लुंचावया) धावतात. मग ती मांजर कंटाळून गुरगुरली की थोडा वेळ ती पिल्ले दबून गप्प बसतात, परंतु आई निवांत बसली की तिच्याभोवती गिरक्या (भंवरे) घालून तिची आंचळे (स्तने) चोखायला (लुंचती) सुरुवात करतात. अशाप्रकारे प्रेमभराने ती पिल्ले आंचळे चोखू लागली व गटागट दूध पिऊ लागली (लुंचतां, ढोसतां) म्हणजे आईचा पान्हा पाझरू लागतो (मातृवात्सल्याने स्तनातून दूध ठिपक्या ठिपक्याने गळू लागते) व ती पूर्वीचे गुरगुरणे विसरून जमिनीवर (क्षितीवर) प्रेमाने पसरते, वात्सल्याचा (प्रेमाचा) उदय झाल्यावर मातेचा कंटाळा पार विरून जातो (हरपे) व आपल्या बाळांना ती चारही पायांनी (चौपायीं) घट्ट कवटाळते आणि त्यांना वरच्यावर सहजगत्या चाटू लागते. खरोखरीच हा समारंभ (सोहळा) अलौकिक असतो. पोरांच्या तीक्ष्ण नखांच्या माराने जशी जशी मातेची ओंटी (जनावराची कास) उकलली जाते (विदारे) तसा तसा वात्सल्याचा उमाळा (प्रेमाचे झरे) अधिक वाढून त्यातून दुधाच्या पुष्कळ धारा वाहू लागतात. जसे ह्या पोरांचे प्रेम त्यांच्या मातेचे दूध उत्पन्न करते तसेच तुमची साईचरणांची आसक्ती साईबाबांच्या हृदयात दयेचा पाझर उत्पन्न करेल. (ओ. ११-१७)

एकदा ठाण्याच्या (महाराष्ट्रातील जिल्ह्याचे शहर) लोकांनी हरीची (ईश्वराची) भक्ती करण्यात आसक्त असलेल्या (हरि+भक्ति+परायण) दासगणूंचे (कै. गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे, पहा, अ. ४, ओ. ८२ वरील टीका) ऐकण्यास गोड असे कीर्तन कौपिनेश्वर मंदिराच्या शेजारी (सन्निधानी) करविले होते. शिष्टांचा आग्रह पडल्यावर दासगणू कथा करायला तयार होत असत, परंतु त्यात कवडीचाही (एक पैशाचाही) गोळा करण्याचा (परिग्रह) लोभ नसे किंवा उगाचच अकडबाजी (दुराग्रह) नसे. कीर्तनाला एकही पैसा (कवडी) द्यावा लागत नसे. अंग (तनु) उघडे असे व डोक्यावर फेटा किंवा पगडी नसे. कमरेला फक्त साधी पंचेजोडी (धोतरजोडी) असे. (तरीसुद्धा) ऐकणाऱ्यांची आवरता न येणारी गर्दी (अनावर उडी) असे. या पोषाखाची गम्मत सांगतो. श्रोत्यांना ऐकायला मौज वाटेल. ती स्वस्थ

चित्ताने ऐकावी. म्हणजे बाबांचे कौतुक कळेल. एकदा दासगणूंचे कीर्तन शिरडी गावात होते म्हणून त्यांनी अंगरखा (अंग+रखा, म्हणजे रक्षक. लांब कोट) घातला. उपरणे (उप+आवरण, म्हणजे झांकण. खांद्यावर घ्यावयाचे एकेरी वस्त्र) पांघरले, डोक्याला (माथी) फेटा बांधला आणि अशा पोषाखाने नटून (समन्वित) ते निघाले. नेहमीच्या शिष्टाचाराप्रमाणे मशिदीत बाबांना आनंदपूर्वक नमस्कार करण्यासाठी गेले, तेव्हा त्यांनी, "वाहव्वा! नवरदेवासारखा सजलास की!" असे बाबांनी म्हटलेले ऐकले. पुढे बाबांनी त्यांना विचारले, "असा नटून कोठे निघालास?" त्यावर दासगणूंनी कीर्तन करावयाला जात आहे, असे सांगितले. तेव्हा बाबा म्हणाले, "अंगरखा, उपरणे, फेटा कशाला पाहिजे? हा त्रास का घेतलास? आपल्याला ही वस्त्रे काही लागत नसतात. काढ ती माझ्यासमोर. यांचा भार अंगावर कशाला हवा?" ही आज्ञा ऐकून दासगणूंनी ती सर्व वस्त्रे काढून तशीच बाबांच्या चरणांवर ठेवली. तेव्हापासून आजपर्यंत दासगणू कीर्तनाच्या वेळी चकचकीत (सोज्वळ) उघड्या अंगाने हातात चिपळ्या घेऊन व गळ्यात माळ घालून असतात. ही तऱ्हा जरी लोकाचाराविरुद्ध असली तरी ती अत्यंत पायाशुद्ध आहे. विद्वानातला विद्वान (प्रबुद्धातील प्रबुद्ध) जो प्रसिद्ध नारदमुनी (ब्रह्मदेवाच्या दहा मानसपुत्रांपैकी एक प्रसिद्ध देवर्षी. हा मोठा विष्णूभक्त असून उघड्या अंगाने गळ्यात माळ घालून हाताने चिपळ्या व वीणा वाजवित श्रीहरीचे गुणगान करीत तिन्ही लोकात हिंडणारा म्हणून पुराणात प्रसिद्ध आहे.) त्याचा हा मार्ग आहे. ही गादी मूळ नारदापासून आलेली आहे व तेथूनच पुढे हरिदासांची (कीर्तनकारांची) रांग (मांदी) सुरू झालेली आहे. त्यांना वरवर दिसणाऱ्या शोभेच्या (बाह्य रंगाची) कटकटीची (उपाधी) जरूरी नसते, तर अंतःकरणाची शुद्धी, हेच त्यांचे ध्येय असते. शरीराचा केवळ खालचा भाग वस्त्राने झाकलेले, चिपळ्या व वीणा वाजवित तोंडाने हरीचे नाम मोठ्याने म्हणणारे नारदाचे रूप (ध्यान) सर्वांच्या माहितीचे (विश्रुत) आहे. साईबाबांच्या कृपेने दासगणू संतांची आख्याने स्वतः तयार करीत आणि विनामूल्य त्यांची कीर्तने करीत असत म्हणून ते प्रसिद्धी (ख्याती) पावले. लोकांच्या साईभक्तीच्या उत्साहाला दासगणूंनी खरोखर आणखी चालना दिली आणि साईप्रेमाचा व आत्मानंदाचा जणूकाय सागरच सर्व ठिकाणी पसरून दिला. भक्तांचे मुकुटमणी नानासाहेब चांदोरकर यांचे साईभक्तांवर अत्यंत उपकार आहेत. साईचरणी लोकांची भक्ती वाढण्यास तेच खरे मूळ कारण आहेत. दासगणूंचे मुंबईला येणे एका चांदोरकरांमुळेच होते. त्यामुळे मुंबईत जागोजागी दासगणूंची कीर्तने आणि साईबाबांची भजने चालली. पुणे, नगर, सोलापूर ह्या प्रांतांत साईमहाराजांची ख्याती आधीच होती. परंतु या कोकणातील (महाराष्ट्राचा पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्यावरील भाग, जेथून बरीच मंडळी कामधंद्यानिमित्त मुंबईला येऊन स्थायिक झालेली आहेत.) लोकांना बाबांची भक्ती लावली ती ह्या दोघांनीच. मुंबई प्रांतात साईबाबांबद्दल जी भक्ती वाढली त्याला मूळ कारण ह्या दोन व्यक्ती. ह्या दोघांच्या हातांनी कृपामूर्ती साईमहाराज मुंबईत प्रगट झाले (त्यांच्या मूर्ती स्थापन झाल्या). (ह्या दोन व्यक्ती आणि कै. काकासाहेब दीक्षित यांच्या साईमहाराजांची कीर्ति मुंबई व ठाणे जिल्ह्यात पसरविण्याच्या प्रयत्नांबद्दल पहा, अ. २, ओ. १०१ वरील टीका.) (ओ. १८-३६)

असो. आता श्रीकौपीनेश्वराच्या मंदिरात दासगणूंच्या कीर्तनातील साईप्रेमाच्या गजरात, हरिनामाच्या जयजयकारात चोळकरांना एकाएकी इच्छा झाली (उठली लहरी). हरीच्या कीर्तनाला ऐकणारे खूप येतात व ऐकण्या-ऐकण्याच्या देखील अनेक तऱ्हा असतात. कोणाला बुवाचे शास्त्रज्ञान (व्युत्पत्ति) आवडते, तर कोणाला त्याचा अभिनय (हावभाव) आवडतो. कोणाची आवड फक्त गाण्यापुरती असते व म्हणतात, "वाहव्वा! काय बुवा गोड गातात! विठ्ठलाच्या नामघोषात काय रंगतात आणि प्रेमाने काय नाचतात!" कोणाचे पूर्वरंगी (कीर्तनाचा पहिला भाग, ज्यात 'संतांचे माहात्म्य' वगैरेसारख्या विषयांचे निरूपण असते त्यात) प्रेम असते, तर कोणाची कथा ऐकण्याकडे आसक्ती असते. कोणाला हरिदासाच्या नकला पाहण्यात रुची असते, तर कोणाला (कीर्तनाच्या उत्तररंगातील, म्हणजे उत्तरार्धातील) आख्याने (दृष्टांतरूप कथा) ऐकायला आवडतात. बुवा अशिक्षित (प्राकृत) असो की विद्वान (व्युत्पन्न) असो, शब्दांच्या पदापदाचे पुष्कळ व वेगवेगळे अर्थ जाणणारा (बहु+अर्थ+संपन्न) असो की उत्तररंगातील आख्याने सांगण्यात प्रवीण असो, ऐकणाऱ्याची तऱ्हा अशीच असते. असे श्रोते पुष्कळ असतात, परंतु कीर्तन ऐकून ज्यांच्या मनात श्रद्धा व भक्ती उत्पन्न होते व ईश्वराच्या आणि संतांच्या चरणी प्रीति जडते, असे श्रोते क्वचित सापडतात (दुर्मिळ). भाराभार ऐकले तरीपण अज्ञानाच्या (अविद्येचे) थरावर थर राहिले, तर तो काय ऐकण्याचा अनुभव (प्रत्यंतर) म्हणावा! ज्यामुळे घाण धुतली जात नाही (मळ+क्षाळण) त्याला साबण कसे म्हणावे आणि ज्यामुळे अज्ञानाचा (अविद्येचा) नाश होत नाही त्याला ऐकणे कसे म्हणावे! (ओ. ३७-४४)

आधीच चोळकर (या नावाचा एक गरीब गृहस्थ ठाण्याच्या सिविल कोर्टात उमेदवार होता.) श्रद्धाळू. (दासगणूंचे कीर्तन ऐकून) त्याला साईबाबांच्या प्रेमाचा उमाळा आला. तो मनात म्हणाला, "हे कृपाळू साईनाथा! या दीनाचा सांभाळ करा." चोळकर बिचारा गरीब उमेदवार (परीक्षा देण्यासाठी आलेला) होता. कुटुंबाचा भार पोसण्यासाठी असमर्थ होता. सरकारच्या पदरी उदरनिर्वाहाचे साधन (शेर) मिळावे म्हणून त्याने बाबांवर जबाबदारी (भार) टाकली. कामुक (मनात काही इच्छा धरणारे) लोक नवस करतात की जर मनासारखे झाले (अभीष्ट+संपादन) तर भरपूर जेवण (इच्छा+भोजन) देऊन ब्राह्मणांना तृप्त करू (संतर्पण). श्रीमंतांचे नवस, बोलणे असते की मनोकामना पूर्ण झाली तर हजार लोकांना जेवण देऊ किंवा शंभर गाईंचे दान (शत+गो+दान) करू. चोळकर आधीच द्रव्यहीन (निर्धन), पण

नवस करायचे मन झाले. श्री साईंचे चरण आठवून केविलवाणे तोंड करून (दीनवदन) तो म्हणाला, "बाबा! गरीबाचा माझा संसार. खूप मेहनत करून परीक्षेची तयारी केली आहे. नोकरीवरच माझी सारी भिस्त (मदार). कायमचा पगार होण्यासाठी परीक्षा पास करावी लागते, नाहीतर गाठीची भाकरी आणि उमेदवारीदेखील जाईल. आपल्या कृपेने पास झालो तर आपल्या पायी हजर (सादर) होईन आणि आपल्या नावाने खडीसाखर वाटीन. हाच माझा पक्का निश्चय आहे. याप्रमाणे चोळकराने नवस केला व मनासारखे झाल्यामुळे (परीक्षेत पास झाल्याने) आनंद झाला. परंतु नवस फेडायला उशीर झाला म्हणून त्याने साखर खाणे सोडले (त्याग केला). शिरडीला जाण्याला वाटेत काही पैसा पाहिजे, रिकाम्या हाताने (रिक्त+हस्ते) जाता येत नाही म्हणून आजचे उद्यावर ढकलले जाऊन चोळकराला तसेच दिवस घालवावे लागले. सह्याद्रीचा (महाराष्ट्रातील पश्चिम किनाऱ्यावरील डोंगराची रांग) अत्यंत मोठा (अफाट) कडा (डोंगराचा खाली रुंद व वर क्रमाक्रमाने निमुळता होत गेलेला माथा) असलेला नाणेघाट (ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील एक घाट, म्हणजे डोंगरावरील अत्यंत बिकट व अडचणीची वाट, ज्याने कोकणचे लोक पुणे जिल्ह्यातील जुन्नरला जात येत असतात.) ओलांडता येईल, परंतु संसारी माणसाला हा उंबरघाट (घराचा उंबरठा) ओलांडायला (घरातून बाहेर पडणे) फार कठीण आहे (दुर्धर). शिरडीचा नवस फेडल्याशिवाय साखरेचा पदार्थ खाता येत नाही म्हणून चोळकराचा चहासुद्धा विनसाखरेचा चालला. असेच काही दिवस गेल्यावर योग्य वेळ सापडून तो शिरडीला गेला व केलेला नवस फेडून त्याच्या मनाला आनंद झाला. साईबाबांचे दर्शन होताच चोळकराने त्यांच्या पायांना नमस्कार करून त्यांच्यापुढे लोटांगण घातले आणि तो अगदी संतुष्ट (आल्हाद परिपूर्ण) झाला. शुद्ध मनाने चोळकराने साखर वाटली, श्रीफळ (नारळ) अर्पण केले व मनात म्हणाला की आज माझे सर्व मनोरथ सफल झाले. साईबाबांच्या दर्शनाने त्याला आनंद झाला व बाबांशी झालेल्या संभाषणाने त्याला सुख वाटले. चोळकर बापूसाहेब जोगांचा पाहुणा होता व जोगांकडेच त्याचे जाणेयेणे होते म्हणून जोग उठल्यावर तोही जाण्यास निघाला, तेव्हा बाबा जोगांना म्हणाले, "याला खूप साखर टाकून चहाचे प्याले पाज." खुणेचे हे शब्द कानी पडताच चोळकराच्या मनाला आश्चर्य वाटले. डोळ्यात आनंदाश्रू येऊन त्याने बाबांच्या चरणी मस्तक ठेवले. जोगांनाही आश्चर्य वाटले. परंतु त्यापेक्षा चोळकराला दुप्पट (द्विगुण) आश्चर्य वाटले, कारण बाबांच्या शब्दांचा अर्थ त्याचा त्यालाच ठाऊक होता व त्यांच्या मनाच्या खुणाही त्याला पटल्या होत्या. बाबांना कधी चहा ठाऊक नव्हता, मग आत्ताच तो का आठवावा? चोळकराला विश्वास पटावा आणि त्याची भक्ती दृढ व्हावी म्हणून बाबांचे हे बोल असावेत. इतक्यात बाबांनी (आणखी) पुरा इशारा दिला (खूण पटविली), "चोळकरा! बोलल्याप्रमाणे दिलेली खडीसाखर (वाचादत्त शर्करा) मला पोहोचली. तुझा साखर सोडण्याचा नेमही पुरा झाला. नवस करताना तुझ्या मनातली गोष्ट, तसेच नवस फेडण्याला दिरंगाई (दीर्घसूत्रता) झाल्यामुळे साखर खाणे सोडून तू घेतलेले प्रायश्चित्त (पापाच्या निरसनासाठी करावयाचे धार्मिक कृत्य किंवा नेम) जरी गुप्त ठेवलेस तरी ते सगळे मला कळले बरे का! तुम्ही कोणी कोठेही असा, माझ्यापुढे भक्तिभावाने ओंजळ धरून विनंती केलीत (पसरिता पसा), तर मी तुमच्यामागे भावासारखा रात्रंदिवस उभा राहीन. माझा देह जरी इकडे व तुम्ही सात समुद्रापलीकडे असला व तिकडे तुम्ही काहीही केलेत, तरी त्याची जाणीव (खबर) मला लगेच होते. दुनियेवर तुम्ही कोठेही जा, मी तुमच्याबरोबरच येत असतो. तुमच्या हृदयातच माझे घर आहे. तुमचा मी अंतर्यामी (आत्मा) आहे.

(बाबांच्या असल्याच वचनांसाठी पहा, अध्याय २:

**कुठेंही असा काहींही करा। एवढे पूर्ण सदैव स्मरा।**
**की तुमच्या इत्थंभूत कृतीच्या खबरा।**
**मज निरंतरा लागती।।१४३।।**
**येणे निदर्शित ऐसा जो मी।**
**तोचि मी सर्वांचा अंतर्यामी।**
**तोच मी हृदयस्थ सर्वगामी।**
**असें मी स्वामी सकळांचा।।१४४।।**)

तुमच्या हृदयात बसलेला असा जो मी त्याला तुम्ही नेहमी नमस्कार करा. सर्व भूतमात्रांच्या हृदयात (अंतर्यामी) मीच (वर्तती) राहत असतो. म्हणून तुम्हाला जो जो घरीदारी अथवा वाटेत भेटेल त्याच्याठिकाणी मीच वागत असतो (रहाटे) व त्यामध्ये मीच वास करीत असतो (तिष्ठे). लहान किडा (कीट), मुंगी, पाण्यात राहणारे व जमिनीवर हिंडणारे प्राणीमात्र (जलचर व खेचर), कुत्रे (श्वान) किंवा डुक्कर (शुकर) या अवघ्या ठिकाणी मीच सदा-सर्वदा (निरंतर) खरोखर (साचार) भरलेलो आहे. माझ्याशी वेगळेपणा (अंतर) मानू नका. तुम्हा व आम्हामध्ये मुळीच अंतर (भेद) नाही (निर्+अंतर), असे जो मजला जाणेल त्याचे भाग्य थोर आहे." ही गोष्ट दिसायला क्षुल्लक (तोकडी) असली तरी गुणाने फार उत्तम (चोखडी) आहे. त्या चोळकरावर बाबांचे कित्ती प्रेम होते (गोडी)! त्याला त्यांनी भक्तीचा ठेवा (जोडी) मिळवून दिला. त्याच्या मनात जे जे होते ते ते बाबांनी अशाप्रकारे अनुभव देऊन दाखवून दिले. केवढे चातुर्य संतांचे! बाबांचे शब्द फार मोलाचे (अनमोल) असतात. भक्तांच्या हृदयात ते फार खोल शिरतात, भक्तीच्या मळ्याला (बागाईत जमिनीला) ओलावा (आशा करण्यास जागा) आणतात आणि भक्तीला डोल (गलबताची डोलकाठी) दाखवितात (मार्ग सांगतात). चातक पक्ष्याची (केवळ ढगांचे पाणी पिऊन राहणारा म्हणून पावसाची अति उत्कंठेने वाट पहात असलेल्या पक्ष्याची) तहान भागविण्यासाठी (तृष्णेच्या परिहारा) मेघ दयाळूपणे

पावसाच्या धारांचा वर्षाव करतात, परंतु परिणामी सबंध पृथ्वीला (अखिल धरा) थंड करतात. तिच तऱ्हा येथे झाली. चोळकर विचारा कोठला कोण. दासगणूंच्या कीर्तनाचे निमित्त झाले व त्याला नवस करायचे मन झाले आणि बाबाही प्रसन्न झाले. त्यामुळेच हा चमत्कार घडला व संतांचे अंतरंग (मन) कळले. बाबा उपदेशाच्या अशा संधी (अवसर) आणीत असत. चोळकराचे केवळ निमित्त होते. सगळ्या भक्तांचे हित साधावयाची बाबांची चतुराई (कळा) नेहमीच न समजण्यासारखी (अकळ) असायची. आपण तिजकडे आश्चर्याने पहातच (विलोकितच) रहावे. (ओ. ४५-८०)

अशीच बाबांची आणखी एक चतुराई (कळा) वर्णन करून हा अध्याय पूर्ण करू या. कसा एकाने प्रश्न केला व त्याचे बाबांनी समाधान कसे केले, ते ऐकू या. एकदा बाबा मशिदीत आपल्या आसनावर बसलेले असताना समोर (सन्मुख) बसलेल्या एका भक्ताने एक पाल चुकचुक आवाज करताना ऐकली. पाल अंगावर पडणे (पल्ली+पतन) किंवा पालीचे चुकचुकणे (पल्ली+वचन) हे पुढे घडून येणाऱ्या गोष्टींची काळजी (भविष्य+अर्था) सूचविते म्हणून कुतूहलाने (जिज्ञासेने) त्याने सहज प्रश्न केला, "बाबा! ही मागच्या भिंतीवरची पाल का चुकचुकत आहे? तिच्या मनात काय असेल? ती अशुभकारी (अमंगल गोष्टी घडविणारी) तर नाही ना?" त्यावर बाबा म्हणाले, "औरंगाबादहून तिची बहीण येथे भेटायला येत आहे म्हणून तिला आनंदाचे भरते आले आहे." आधी पाल तो केवढासा प्राणी! तिला कोठले आईबाप आणि कोठले भाऊबहीण! तिला संसारातील व्यवहारसंबंध (व्यवसाय) कोठून असणार! म्हणून बाबांनी हे काहीतरी गमतीने उत्तर दिले, असे मानून तो (प्रश्न विचारणारा) भक्त क्षणभर स्वस्थ बसला. इतक्यात औरंगाबादहून एक गृहस्थ बाबांचे दर्शन घेण्याकरिता घोड्यावरून आला. त्यावेळी बाबा स्नान करीत होते. त्याला पुढे जायचे होते आणि चंदी (घोडे वगैरेंना नित्य द्यावयाचा दाणा) वाचून घोडा चालत नसतो म्हणून थोडे हरभरे (चणे) विकत घेण्यासाठी तो बाजाराकडे निघाला. या नवीन सौदागराकडे (व्यापाऱ्याकडे) प्रश्न विचारणारा आश्चर्याने पाहू लागला. इतक्यात सौदागराने बगलेतला (खाकेचा) तोबरा (हरभरे इत्यादी भरून घोड्याच्या तोंडाला लावण्याची पिशवी) कचरा झाडण्यासाठी झटकला. जमिनीवर (क्षितीवर) उपडा (तोंड खाली करून) आपटताच त्यातून एक पाल बाहेर पडली व घाबऱ्या-घाबऱ्या सर्वांच्या देखत सरसर पळाली. प्रश्न विचारणाऱ्याला बाबा म्हणाले, "आता तिच्यावर लक्ष ठेव. पालीची बहीण ती हीच. तिची चमत्कृती (अद्भुत करामत) पहा." ती जी तेथून तडक निघाली ती आपली मोठी बहीण (ताई) जिकडे चुकचुक करीत होती त्या आवाजावर रोख धरून चमकत, ठुमकत (डौलाने व नखऱ्याने) चालली. बहिणी-बहिणींची ती गाठ, खूप दिवसांनी झालेली भेट. गाढ आलिंगने देऊन त्या एकमेकींची सारखी चुंबने घेऊ लागल्या. खरोखरीच त्यांच्या प्रेमाचा तो थाट अलौकिक होता. एकमेकींना गिरक्या घालू लागल्या (एकमेकींभोवती गोलगोल फिरू लागल्या). आनंदाने भिरक्या मारू (स्वतःभोवती गरगर फिरू) लागल्या. उभ्या (वर सरळ), आडव्या (बाजूला सरळ), तिरक्या (बाकड्या) मनाला येईल तशा (स्वच्छंद) फिरक्या (फेऱ्या) मारू लागल्या. ते औरंगाबाद शहर कोठे आणि शिरडी गाव कोठे (एकमेकांपासून किती दूर), काय हा प्रकार? हा घोडेस्वार अचानक (अवचित) कसा यावा आणि त्याच्याबरोबर पालसुद्धा कशी यावी? पाल असेल औरंगाबादची, तोबऱ्यामध्ये शिरलेलीही असेल, परंतु त्या प्रश्नोत्तराची अनुकूल वेळ (संधी) कशी नेमकी आली? पाल काय चुकचुकावी, त्या भक्ताला प्रश्न विचारण्याची स्फूर्ती ती काय व्हावी, त्याचा गर्भितार्थ (अर्थ+उपपत्ति) बाबांनी समजावून काय सांगावा आणि अनुभवही काय लगेच यावा! असा हा अप्रतिम (अद्वितीय) योग लाभला. बाबांचे विनोदावर सदा प्रेम होते. संतजन अनुपम (सर्वोत्कृष्ट) साधने योजून भक्तांचे कल्याण (क्षेम) वृद्धिंगत करतात. पहा, हा जिज्ञासू (चौकस बुद्धीचा गृहस्थ) नसता तर पालीच्या चुकचुकण्याचा अर्थ कोणाला कळला असता! आणि साईबाबांचा महिमा कसा समजला असता! अनेक वेळा चुकचुकणाऱ्या अनेक पाली सर्वांना ठाऊक आहेत, परंतु त्या चुकचुक शब्दांचा अर्थ किंवा त्या पालींसंबंधी माहिती (वार्ता) कोणी कधी विचारली होती का! सारांश, या जगाच्या खेळाच्या पूर्वी करून ठेवलेल्या योजना (सूत्रे) गुप्त व कोणालाही न कळणाऱ्या असतात. त्यांच्याबद्दल कोणालाही आधी तर्क (अटकळ) करता येत नाही आणि म्हणून त्या घडल्यावर सगळ्यांना आश्चर्य वाटते. उलट, ह्या पाली चुकचुक आवाज करू लागल्या म्हणजे काही अनर्थ घडेल, असे सुचविले जाते; परंतु त्यावेळी तोंडाने 'कृष्ण कृष्ण' असे म्हटले तर येणारा अनर्थ टळतो, असे लोक म्हणतात. (पालींच्या) आवाजाचा अर्थ (व्युत्पत्ति) काहीही असो. ही आश्चर्यकारक कृती (चमत्कृती) नव्हे. आपल्या भक्तांना आपल्या पायी दृढ बसविण्यासाठी बाबांची ही उत्तम युक्ती होती. (ओ. ८१-१०४)

हा अध्याय जो आदराने वाचील अथवा नेमाने त्याचे पारायण (आवर्तन) करील त्याचे संकट गुरुमहाराज दूर करतील, हे मनात पक्के ध्यानात ठेवा (खूण अंतरी ही बांधा). त्यांच्या पायी जो निःसंशयपणे (तत्वतः) मस्तक ठेवील (माथा वाही तत्वतः) त्याचा साई हाच त्राता (वाचविणारा), पाता (पावणारा, पालन करणारा), अभयदाता (संरक्षणाची खात्री देणारा), कर्ता (सर्वकाही घडवून आणणारा) व हर्ता (सर्व विघ्ने हिरावून घेणारा) असतो. येथे (माझ्या सांगण्यात) काही चूक (अंतर) आहे, असे मानू नका. हा साईनाथ असाच आहे. माझ्या स्वतःच्या अनुभवाचा गुप्त सारांश (भावार्थ) मी भक्तांच्या

कल्याणासाठी सांगतो. या जगात संपूर्ण मीच एक आहे. माझ्याशिवाय आणखी दुसरे काही नाही. केवळ हाच लोक (पृथ्वीलोक) नव्हे, तर सबंध (अखिल) त्रिलोक (पृथ्वी, आकाश, पाताळ) देखील मीच मी आहे, असे अद्वितीयत्त्वाचे (माझ्याशिवाय दुसरे कोणी नाही असे) स्फुरण जेथे असते तेथे भीतीची गोष्टच उरत नाही. त्याला अभिमान व अहंकाराशिवाय सर्व चैतन्यच (चिन्मात्र) भरलेले दिसते.

(पहा, अ. ४ "**ऐसें अखिल विश्व जेव्हां। मीच मी हे प्रबोधेल तेव्हां। मग त्या सुखाचा काय सुहावा। परम सद्भावा पावेल॥४१॥ ऐसें मीपण जेव्हां पावावें। वैर तें करावें कोणासवें। किमर्थ वा कवणासी भ्यावें। अन्यचि ठावें जंव नाहीं॥४२॥**") (ओ. १०५-१०९)

हेमाडपंत साईंना शरण आलेले आहेत. एकही क्षण त्यांचे चरण ते सोडत नाहीत, कारण ते (चरण) संसारसागर पार करण्याचे साधन (तरण) आहेत. आता माझे गोड निरूपण ऐका (अवधारा). पुढच्या अध्यायात गुरुवर्य श्री साई एक सुंदर प्रसंग निर्माण करतील. लोकांना ब्रह्मज्ञान चुटकीवारी (चुटकीसारखे, म्हणजे हाताच्या अंगठा व एक बोट यांनी काढलेल्या आवाजाप्रमाणे सोपे व चटकन) हवे असते, जणूकाय ते रस्त्यावरच पडलेले असते. कोणी एक लोभी गृहस्थ साईबाबांना ब्रह्मज्ञान विचारील, तर साईमहाराज ते त्याच्या खिशातूनच काढून देतील. हे कथानक श्रोत्यांनी ऐकल्यावर त्यांना बाबांची आश्चर्यकारक करणी दिसून येईल. सर्वस्वी पूर्णपणे (मिष्टंक) लोभ सुटल्याशिवाय ब्रह्म कधीच मिळणे शक्य नसते (नि:संशय अप्राप्य). ब्रह्म प्राप्त करण्याची पात्रता (अधिकार) कोणाला असते, याचा कोणीही विचार करीत नाही. साईमहाराज कोणाला ते कसे प्राप्त करता येईल, याचे सविस्तर विवेचन (विवरण) करतील. मी श्रोत्यांपुढे पदर पसरून विनंती करतो की हा साईचा प्रेमाचा खेळ (विलास) अत्यंत उत्साहाने ऐका. त्यामुळे तुमचे चित्त प्रसन्न होईल, विषयग्रहणशक्तीचे (चैतन्य) समाधान लाभेल आणि संतांचे महिमान कळेल. म्हणून श्रोत्यांनी इकडे लक्ष द्यावे. (ओ. ११०-११६)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साईसमर्थ यांच्या सत्यचरित्राचा **'चोळकर शर्करा आख्यानं'** (चोळकरांच्या खडीसाखरेच्या नवसाची कहाणी) नावाचा पंधरावा अध्याय समाप्त झाला.

**श्रीसद्गुरु साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**

## अध्याय १५ ची आणखी टीका

अकराव्या अध्यायाप्रमाणे याही अध्यायाचे आदरपूर्वक वाचन अथवा नेमाने पारायण केल्याने संकट निवारण (अनिष्ट+निवृत्ति) होते म्हणून आणि त्यातून हा अगदी छोटासा (फक्त ११६ ओव्यांचा) आणि समजण्यास फार सोपा असल्याने अलिकडे याही अध्यायाचे भक्तांकडून, एवढेच काय काही मुलामुलींकडूनही पठण केले जात आहे.

**वाचील जो हा अध्याय आदरीं।**
**अथवा नेमाने आवर्तन करी।**
**तयाचे संकट गुरुराय निवारी।**
**खूण अंतरीं दृढ बांधा॥१०५॥**
**अनन्यभावें चरणीं माथा। जो जो वाही तयासी तत्त्वतां।**
**त्राता पाता अभयदाता। कर्ता हर्ता तो एक॥१०६॥**

या अध्यायाच्या वरच्या फलश्रुतीचे मलाही बरेच अनुभव आलेले आहेत. त्यातील एक अनुभव येथे सांगतो. १८ जून १९८३ची गोष्ट. माझ्या सैन्यातील मुलाची सरहद्दीवर, जेथे मुलाबाळांना बरोबर नेता येत नाही अशा ठिकाणी, बदली झाल्यामुळे सून दोन मुलांसह पुण्यात माझ्याकडे रहावयास आली होती. धाकट्या मुलाला सेंट विन्सेंट स्कूलमध्ये प्रवेशासाठी प्रयत्न चालू होता. बदलीचेच कळायला विलंब झाल्याने आम्हाला उशीर झाला होता. प्रवेश संपले होते. खूप खटपट करूनही प्रवेशाबद्दल निश्चित काही कळेना व आम्हाला फार काळजी वाटत होती. रोज एक अध्याय वाचण्याच्या माझ्या नेमाप्रमाणे तो घेतल्यावर त्या दिवशी योगायोगाने १५ वा अध्याय आला. अध्यायाच्या शेवटी वरील १०५-१०६ व्या ओव्या वाचल्यावर नातवाच्या शाळेच्या प्रवेशाची आठवण झाली आणि आपले हे संकट बाबा निश्चित दूर करतील, याची खात्री वाटली. मनात आले की पुन्हा एकदा हा अध्याय वाचावा आणि तो लगेच वाचला. आश्चर्य म्हणजे त्या दिवशी सून प्रवेशाबद्दल तपास करण्यासाठी गेली, तर प्राचार्यांनीच तिला हाक मारून मुलाला प्रवेश दिल्याची आनंदाची बातमी सांगितली. मला कळल्यावर मीही चोळकरांप्रमाणे बाबांना खडीसाखरेचा नैवेद्य दाखवून सर्वांना तो वाटला. अशाप्रकारे बाबांनी माझी काळजी दूर होणार याची आधी सूचना तर दिलीच, पण १५व्या अध्यायाच्या 'संकटमोचन' गुणाची प्रचितीदेखील देऊन मला हर्षित केले.

या अध्यायातील चोळकरांचे आख्यान म्हणजे भक्ताची अनन्य भक्ती असली की परमेश्वराचे किंवा सद्गुरूचे अंत:करण कसे द्रवते व त्या भक्ताला मुलाप्रमाणे पोटाशी घेऊन त्याचे लाड ते कसे पुरवितात, याचे साक्षात् उदाहरण आहे. याचे वर्णन करताना हेमाडपंतांनी मांजर व तिची पिल्ले यांची अनुरूप व सुंदर उपमा वापरली आहे :

**नुकतीच पाजूनि गेली बाहेरी।**
**मागुतेनि आली जरी मार्जारी।**
**तरी फिरफिरोनि पोरें तिजवरी।**
**धांवती प्रेमभरीं लुंचावया॥१२॥**
**मग ते कंटाळुनी गुरगुरे। क्षणैक जरी दवती पोरें।**

आई निवांत बैसली पुरे। घालोनि भंवरे लुंचनी॥१३॥
लुंचता ढोसतां प्रेमभरें। आईलागीं पान्हा पाझरे।
मग तीच पूर्वील गुरगुरणें विसरें।
प्रीतीने पसरे क्षितीवरी॥१४॥
प्रेमोदयीं हरपे कंटाळा।
चौपायी कवटाळी वृद्ध निजबाळां।
वरचेवरी चाटी अवलीळा।
काय तो सोहळा अलोकिक॥१५॥
पोरांच्या तीक्ष्ण नखप्रहारें।
जों जों मातेची ओंटी विदारे।
तों तों अधिक प्रेमाचे झरे। दुग्ध ओझरे बहुधारा॥१६॥
जैसी त्या बाळांची अनन्य भक्ति।
मातेसी करी दुग्धोत्पत्ति।
तैसीच तुमची साईपदासक्ति।
द्रववील चित्तीं साईतें॥१७॥

या आख्यानाच्या ओघाने पुढे दासगणूंची कीर्तन करताना घालण्याच्या पोपाखाची मौजेची कथा आली आहे. बाबांनी त्यांची **'वाहवा नवरदेव की सजलासि आतां'** अशी थट्टा करून त्यांना अंगरखा, उपरणे व फेटा तेथल्या तेथे काढावयाला लावून त्यांना अत्यंत पायाशुद्ध नारदीय कीर्तनपद्धतीचा धडा दिला व माळा-मंडन किंवा सांप्रदायिक वरकरणी पोषाखापेक्षा अंत:करणातील खऱ्या भक्तीचे महत्त्व पटवून दिले.

ही नारदीय मूळ गादी। येथूनचि हरिदासांची मांदी।
बाह्य रंगाची न ज्यां उपाधी। अंत:शुद्धि ध्येय ज्यां॥२९॥
अधोभागचि वस्त्राच्छादित। चिपळ्या वीणा वाजवीत।
मुखीं हरिनाम गर्जत। ध्यान विश्रुत नारदाचें॥३०॥

नंतर चोळकरांना **''नवस वेळेचे तुझें चित्त। दीर्घसूत्रतेचें प्रायश्चित्त। हे जरी तुझें ठेवणें गुप्त। तें मज समस्त कळलेंगा॥६६॥** असे सांगून बाबांनी त्यांनाच नाही, तर आपल्या सर्व भक्तांना आश्वासन दिले आहे.

तुम्ही कोणी कुठेंही असा।
भावें मजपुढें पसरिता पसा।
मी तुमचिया भावासरिसा। रात्रंदिसा उभाच॥६७॥

माझा देह जरी इकडे। तुम्ही सातां समुद्रांपलीकडे।
तुम्ही कांहीहीं करा तिकडे। जाणीव मज तात्काळ॥६८॥
कुठेंही जा दुनियेवर। मी तों तुम्हांबरोबर।
तुम्हां हृदयींच माझे घर। अंतर्यामी तुमचें मी॥६९॥

बाबा पुढे उपदेश करतात:

ऐसा तुम्हां हृदयस्थ जो मी। तयासी नमा नित्य तुम्ही।
भूतमात्राच्याही अंतर्यामीं। तोंच तो मी वर्ततों॥७०॥
यास्तव तुम्हास जो जो भेटे। घरीं दारीं अथवा वाटे।
ते ते ठायी मीच ग्हाटें। मीच तिष्ठें त्यामाजीं॥७१॥
कीड मुंगी जलचर खेचर। प्राणिमात्र श्वान शूकर।
अवघ्या ठायीं मीच निरंतर। भरलों साचार सर्वत्र॥७२॥
मजशीं धरूं नका अंतर। तुम्ही आम्ही निरंतर।
ऐसें मज जो जाणील नर। भाग्य थोर तयाचें॥७३॥

याच सिद्धांताच्या प्रमाणासाठीच जणूकाय पुढची पालींची बहिणी-बहिणींची गाठ बाबांनी घडवून आणली होती, असे वाटते. त्या पालींशी एकात्मता असल्याशिवायच का बाबांना त्यांच्या **'एकमेकींस घालीत गिरक्या। आनंदाने मारीत भिरक्या। गेल्या उभ्या आडव्या तिरक्या। स्वच्छंद फिरक्या मारीत॥९५॥'** मिलनाचे कारण कळले असते! तसेच **'जगाचा हा खेळ, सूत्रे गुप्त आणि अकळ'** चालविणारे स्वत: बाबा नसते तर पाल चुकचुकून त्याबद्दल कोणी प्रश्न विचारणे व औरंगाबादहून घोड्यावर येणाऱ्या गृहस्थाच्या तोबऱ्यातून दुसरी पाल निघणे, ह्या गोष्टी घडवून आणणे शक्य होते का!

या अध्यायाची **'तयाचे संकट गुरुराय निवारी'** अशी फलश्रुती सांगितली असली, तरी ज्यांना येथे सांगितलेल्या तत्त्वांचा भावार्थ नीट कळला असेल व ज्यांनी तो आचरणात आणला असेल त्यांच्याबाबतीत कसल्याही भीतीची गोष्ट राहणारच नाही:

अंगीं संपूर्ण मीचि एक।
दुजें न मजविण कांहीं आणिक।
नाहीं केवळ हाचि लोक।
अखिल त्रैलोक्य मीचि मी॥१०८॥
ऐसें अद्वितीयत्व जेथें स्फुरे।
तेथे भयाची वार्ताचि नुरे।
निरभिमाने निरहंकारें।
चिन्मात्र सारें भरलें ज्या॥१०९॥

कसेही असो. **'उपदेशार्थ बाबा तत्पर'** असल्याने ते **'ऐसे अवसर आणीत'** आणि चोळकरांचे, दासगणूंचे किंवा पालीचे निमित्त करून सर्वांनाच उपदेश देत:

चातक-तृष्णेच्या परिहारा। मेघ सदयता वर्षे धारा।
परिणामीं निवे अखिल धरा। तेच तऱ्हा हे झाली॥७७॥

## अध्याय १६वा

### ''ब्रह्मज्ञान कथनं – १''

(जगाचें उत्पत्तीकारण व मूळ घटक असलेले जे ब्रह्म त्याचे व त्याच्या प्राप्तीचें निरूपण)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरूमहाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरू साईनाथांना नमस्कार असो.

(सुरुवातीच्या ओ. १ ते ८ मध्ये हेमाडपंतांनी श्री साई सद्गुरु महाराजांना 'शांति' सिंहासनावर बसलेले 'स्वानंद साम्राज्याचे सम्राट' कल्पून त्यांच्या आध्यात्मिक वैभवाचे सुंदर रूपात्मक वर्णन केले आहे.)

'शांति'रूपी सिंहासनावर बसलेले 'स्वानंद' (आत्मानंद म्हणजे आत्म्याची जाणीव झाल्याने होणारा आनंद) रूपी साम्राज्याचे मालक, राजांचे राजे, चक्रवर्ती व आपले एकमेव आधार (अनन्य+गती) अशा गुरुमहाराजांना नमस्कार करुया. त्यांच्या दोन्ही बाजूला 'अभेद भक्ती' (अविभक्त किंवा अनन्य भक्ती) व 'सहज स्थिती' (स्वाभाविक म्हणजे कसल्याही बंधनात न गुंतलेली मुक्त स्थिती) चवऱ्या ढाळीत आहेत आणि 'स्वानुभूति' (तूर्यावस्था म्हणजे ब्रह्माशी तादात्म्य झाल्याची जीवाची स्थिती) व 'सद्यःप्रतिती' (तात्काळ व निश्चित अनुभव) अत्यंत आदराने पंख्यांनी वारा घालीत आहेत (वीजिती). 'स्वात्मस्थिति' (स्वरूपी स्थिर असलेली अवस्था) छत्र धरीत आहे व 'शांतिसंवित्ति' (शांतीची चांगली वृत्ती) वेत्र (राजाच्या चोपदाराच्या हातातील काठी) धरीत आहे. षड्रिपु (काम, क्रोध वगैरे सहा शत्रू) व मायामोहाची वृत्ती तेथे क्षणभरही टिकू शकत नाहीत (न तगती). या सभेचा थाट काय वर्णावा! चार वेद, सहा दर्शने (पहा, अ. ४, ओ. २० वरील टीका) आणि अठरा पुराणे तर स्तुतिस्तोत्रे गाणारे (भाट) आहेत. शुद्ध ज्ञानाचा प्रकाश (चिन्मय+चांदवा) लकलक चमकत आहे व 'स्वानंद' (आत्मानंद) अतिशय दाट पसरलेला आहे. विरक्ती, भक्ती, शुद्ध ज्ञान, मनन, निदिध्यासन (अखंड चिंतन), निजानुसंधान (आपल्या आत्म्याचे सतत ध्यान) व साक्षात्करण (परमेश्वराचे प्रत्यक्ष दर्शन) हे अष्टप्रधान (आठ मंत्री) सेवेत मग्न आहेत. 'शान्ति' (मनोविकाराची शांति) व 'दान्ति' (मनोविकारांचा संयम किंवा ताबा) हे दिव्य मणी त्यांचे कंठ भूषवित आहेत आणि वेदान्तरूपी सागरातील अमृत वाहणारे (सुधा तरंगिणी) त्यांचे मधुर बोल (वाणी) आहेत. जिची धार (तिक्ष्ण बाजू) तेजाने झळकत आहे अशा ज्ञानरूपी तलवारीचा वार (खड्गाच्या प्रहार) करण्यासाठी उंचावलेला त्यांचा हात पाहून संसाररूपी वृक्ष थरथर कापत आहे. हे निरंजना (निर्मळा), अव्यया (अविनाशा) व गुणातीता (गुणांच्या पलीकडे असलेल्या) योगीराजा! तुमचा जयजयकार असो. दीन जनांचा उद्धार व दुसऱ्यावर उपकार करण्यासाठीच तुम्ही हा देह (काया) धारण केला आहे. (ओ. १-८)

मागच्या अध्यायात श्री साईबाबांनी एका भक्ताची (चोळकराची) इच्छा पूर्ण करून, त्याने केलेला नेम (पण) पुरवून, त्याला त्याच्या मनाची खूण कशी पटविली, याचे वर्णन झाले. सद्गुरुंच्या सर्व इच्छा पूर्ण झालेल्या असतात (अवाप्त+काम). शिष्य त्यांच्या इच्छा काय पूर्ण करणार! शिष्याचीच सेवा करण्याची इच्छा पुरवून त्याला ते निरिच्छ करतील. भक्तीने फूल किंवा पानसुद्धा त्यांना अर्पण केले तर ते अत्यंत प्रेमाने घेतील. (अशाच अर्थाचे श्रीकृष्ण भगवानांचे शब्द गीतेतल्या ९व्या अध्यायात आहेत. "**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥२६॥** जो कोणी मला पान, फूल, फळ किंवा पाणीही भक्तीने अर्पण करितो, त्या शुद्धचित्त मनुष्याच्या भक्तीच्या उपहाराचा म्हणजे भेटीचा मी मोठ्या प्रेमाने अंगिकार करतो.) परंतु तेच ताठ्याने किंवा दिमाख दाखवून (साभिमान) दिले तर त्याचा लागलीच अव्हेर करतील (फिरवितील मांन जागीच). सत्य (सत्), ज्ञान (चित्) व आनंदाचे (सुखाचे) ते सागर असल्याने त्यांना दिखाऊ (बाह्य) उपचाराचे महत्त्व वाटत नसते. परंतु तेच श्रद्धा व भोळ्या भावाने (भावार्थाने) अर्पण केले असता ते त्याचा अत्यंत आनंदाने स्वीकार करतात. स्वतःला काहीच समजत नाही असे दाखवितात (नेणतेपणाचे पांघरूण) परंतु अज्ञान घेऊन ज्ञान देतात आणि शास्त्रसिद्ध रूढींच्या मर्यादा न ओलांडता (न करितां अतिक्रमण) शिष्यांना गोड शिकवण देतात. त्यांची प्रेमाने सेवा केली असता सेवा करणारा ब्रह्माशी म्हणजे परमेश्वराशी ऐक्यता (ब्रह्म+सायुज्य) प्राप्त करतो. इतर सर्व साधने सोडावी (ठकावे) व गुरुसेवेत लीन व्हावे. त्या सेवेत थोडीही कुचराई (अंगचोरपणा) केली किंवा त्यात आपली चतुराई (हा श्री साईबाबांचा शब्द. याचा अर्थ शहाणपणा. "फार चतुराई कामाची नाही. श्रेष्ठ व वयोवृद्ध सांगतील ते ऐकत जावे," असे ते आपल्या भक्तांना पुष्कळदा म्हणत असत.) दाखविली तर साधक संकटात (अपायीं) पडेल. गुरुच्या पायी विश्वास पाहिजे. स्वतः शिष्य काय करतो? सद्गुरुच त्याची सोय लावतो (मेळ बसवून देतो). शिष्याला आपल्या संकटाची कल्पना नसते. गुरुच नकळत त्याचा उपाय करतो. गुरुपेक्षा (परीस) आणखी मोठा उदार दाता (वदान्य) त्रिभुवनात्त दुसरा कोणी नाही. शरणागतांचा जो श्रेष्ठ आश्रयदाता (शरण्यांचा परम शरण्य) त्या सद्गुरुला शरण जाऊया. सद्गुरुला चिंतामणीची (इच्छिलेली इष्ट वस्तु देणारे एक स्वर्गीय रत्न) उपमा द्यावी तर चिंतामणी फक्त चिंतिलेलेच (ज्या गोष्टीचा मनात विचार येईल तिच) देतो, परंतु गुरु अचिंत्य (जिचा मनात विचारही आला नसेल अशी) वस्तु देऊन भक्ताला आश्चर्याचा धक्का देतो. कल्पतरूशी (इंद्रलोकातील एक काल्पनिक वृक्ष. इच्छिलेली कोणतीही वस्तु यापासून मिळते.) तुलना करावी तर तो (वृक्ष) भक्त जे मनात आणील (कल्पितार्थासी) तेच पुरवितो. परंतु गुरुराज निर्विकल्प (जेथे कोणतीही कल्पना किंवा विचार नसेल अशी) स्थिती देतो. कामधेनू (धन्याने इच्छिलेली वस्तु तात्काळ देणारी गाय) इच्छा करावी तेच देते. पण गुरुरुपी धेनूची थोरवी तिच्याहून मोठी आहे. गुरुरुपी धेनूशिवाय 'अचिंत्यदानी' (कधीही न इच्छिलेले देणारी) अशी पदवी कोण बरे मिरवू शकेल! (ओ. ९-२०)

(क्रमशः)

## 'श्री साईलीला' सभासदांना निवेदन

'श्री साईलीला'ची वार्षिक वर्गणी रु. २५ असून आजीव सभासद वर्गणी रु. ५०० आहे. तरी जुन्या सभासदांनी व नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

'श्री साईलीला'च्या आजीव सभासदांना मराठी किंवा इंग्रजी-हिंदी अंकांपैकी एकच अंक पाठविण्यात येईल. तरी आजीव सभासदांनी त्यांना वरीलपैकी कोणता अंक हवा आहे, ते अवश्य कळवावे.

'श्री साईलीला'संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना 'श्री साईलीला'च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या 'श्री साईलीला' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.

'श्री साईलीला'च्या वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

पत्त्यात बदल झाल्यास मुंबई कार्यालयाला त्वरित कळवावे. पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

पोता आगळ हाजर करवा माटे–कहो के तेथी वधु पण लाववा–कहे तो तारे तेम करवा शा माटे आनाकानी करवी जोइए? अने प्रीय वाचक, ते ते मुजब वर्तन कर्युं एटले तारो बधो बोजो ते सद्गुरुनाज शीरपर रहे छे अने पछी तेओ श्रीनेज तपासवानुं छे के तारुं कल्याण करवुं. तात्पर्य एटलुंज के श्री सद्गुरुमां तारो विश्वास अने श्रद्धा दृढ होवां जोईए. जेवी रीते बाबा दक्षिणा मांगे छे त्यारे केटलाको शंका लावे छे तेवीज रीते केटलाकोने बाबा तेमनां वतने पाछा फरवानी तुरत रजा आपता नथी अने शिरडीमांज रहेवा फरमावे छे त्यारे पण तेवींज शंका तेमना मनमां उत्पन्न थाय छे अने पोताना धंधानी, नोकरीनी अने कुटुंबनी फीकरमां तेओ पडे छे. पण पोताना भक्तना बाबमां कंई खराब बनाव बनवानो होय (जेनो श्री गुरुराज शीवाय बीजाने ख्याल पण होतो नथी) ते टाळवा माटेज तेओश्री ते भक्तने तुरत रजा आपता नथी. तेवी वेळा टळी गई के तुरतज तेने रजा आपवामां आवे छे. अने एवा घणा दाखला बन्या छे जेमां बाबानी रजावगर जओ शिरडी छोडी पोताने वतन गया छे तेमने पोताना तेवा खराब वखतने लीधे दुःखी थवुं पड्युं छे अने बाबाना बोलने याद करीने पाछुं तेमनां दर्शने आववुं पड्युं छे. भक्तने तेवी रीते तुर्त रजा नहीं आपवानो बनाव भाग्येज बने छे. कामधंधावाला माणसोने बाबा कदी रोकताज नथी अने दरेके दरेक दाखलामां जेमने रोके छे तेमने नुकशानने बदले लाभज थयलो पुरवार थयो छे. सारांश मात्र एटलोज के जे पोतानुं कल्याण इच्छतो होय तेणे आत्मशुद्धीनी ज्योति जे श्री सद्गुरु शीवाय कोई प्रगटावी शके तेम नथी तेमनी पासे खुशीथी पोतानुं जे कंई छे तेनो भोग आपवोज जोईए. ज्यारे भक्त तरफथी तेना सद्गुरुने संतोष थाय छे तेवी रीतना भोग आपवामां आवे छे त्यारेज श्री सद्गुरु ते भक्तनी लायकात मुजब तेनुं कल्याण करे छे.

उपर वर्णवेलो प्रकार आ दुनियानी मोहमायामां पडेलुं मनुष्य भाग्येज कबुल करी शकशे कारण के चालु जमानाना लोको थोडी महेनते मोटा लाभ मेळववा इच्छा राखे छे. पोतानां कल्याण माटे पोतानुं तन, मन अने धन जे कंई छे ते पोताना सद्गुरुने तेओ श्रीनी मरजी माफक वापरवा अर्पण करवुं जोईए. जे उपर तबक्कामाथी पसार थयो तेने पछी आ दुनियामां कोई जातनी फीकर चींता रहेती नथी कारण के तेनां दुःख आफतनो सघलो बोजो भक्तवत्सल, दयासागर श्री सद्गुरुनेज शीर रहे छे. दुनियादारीमां मची रहेलो वांचक उपली वीगत वांचीने वीचारमां पडशे के उपर वर्णवेलुं वर्तन बनी शक्युं मुश्केल छे अने आ दीन लेखक पण ते कबुल करे छे के हजारोमां तेवो एकादज खरो भक्त नीकळी शके जे उपर लख्यु तेम पोतानु तन, मन अने धन श्री सद्गुरुने अर्पण करी शके. तेथी, हे प्रीय वांचक, कंईपण शंका मनमा लावीने तारे बाबानां दर्शने जवानो वीचार कंई मांडी वाळवो जोईए नहीं. एक वखत ते महाउदार, दयासागर श्री साई मुनिवर्यनां दर्शने तुं जशे अने तेओ श्रीना आशिर्वादथी तने जे लाभ प्राप्त थशे पछी तो तुं तेओ श्रीने भविष्यमां कदी पण वीसरवानोज नहीं तेनी आ लेखक पक्की खातरी आपे छे. धीमे धीमे तूं तेओ श्रीने वधु अने वधु ओळख–तो जईश त्यारेज तारी खातरी थशे के उपर जे कंई लखवामां आव्युं छे तेमां लेशमात्र पण असत्य नथी.

## श्री बाबाना उपदेशमांना थोडा शब्दो

पृ. ६१

बाबाना सर्व साधारण उपदेशमांथी थोडा शब्दो नीचे टाकवामां आवे छे:

"परमेश्वर छे अने तेना करतां मोटो बीजो कोई नथी. ते सर्वव्यापक छे. तेने लीलानो पार नथी. पेदा पण तेज करे छे, राखे छे पण तेज, वधारे छे पण तेज अने मारे छे पण तेज. ते जेम राखे तेम रहेवुं. तेनी मरजी मुजब आपणे राजी रहेवुं जोईए तळमळाट करवो जोईए नही. तेनी इच्छा शीवाय झाडनुं पांदडुं पण हीली शकतुं नथी.

दरेके नेकीथी चालवुं.

सारा विचार करवानी शक्ति कायम जागृत राखवी.

आपणु कर्तव्य आपणे करवुं, पण ते में कर्युं तेवु अभिमान पोते न लेतां ते कतृत्व परमेश्वरनें आपवुं, अने तेनुं फल पण तेनेज अर्पण करवुं. मतलब के आपणे अलिप्त रहेवाथी कर्म आपणने बाधक थशे नहीं.

सर्व जीव साथे प्रेमपूर्वक वर्तवुं.

वादावाद करवो नहीं. कोई कइं बोले तो सांभळी लेवुं. कोईना बोलवाथी आपणां अंगने काणां पडतां नथी.

कोईनी बरोबरी करवी नही.

कोईनी निंदा करवी नही.

कोई कंई खराब काम करे तो आपणे ते तरफ ध्यान पण आपवुं नही. जेनुं करवुं तेने साथे, आपणां आपणी साथे.

इष्ट करता रहेवुं.

नकामुं रहेवुं नही.

ईश्वरनुं नाम लेता रहेवुं.

धर्मना पुस्तको वाचतां रहेवुं.

आहार-विहार त्यागवो नहीं, पण नियमित राखवो वीगेरे.

बाबा उपदेश आपे छे ते मोटे भागे वार्तारूपे आपे

(पृष्ठ क्र. ३३ वर)

# श्री साईंचे सत्य चरित्र – अध्याय १६ वा

**सटीक गद्य अनुवाद :**
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

(मागील अंकावरून पुढे चालू)

आता श्रोत्यांना हीच विनंती की मागच्या अध्यायाच्या शेवटी मी ब्रह्मार्थीला (ब्रह्मज्ञान मागणाऱ्याला) ब्रह्मज्ञान कसे प्राप्त झाले ते सांगेन म्हटले होते, त्या कथेकडे लक्ष द्यावे. (आता) आलेल्या ब्रह्मज्ञानाच्या भोक्त्याची (अत्यंत आवड असलेल्याची) बाबा कशी तृप्ती (समाधान) करतात, आपल्या भक्तांना कसा उपदेश करतात, ते परमार्थ (ईश्वरसाधनरूप पुरुषार्थ) साधण्यासाठी ऐका जी (परिसा जी). संत नेहमी कुठलीही इच्छा नसलेले (निष्काम) असतात व त्यांच्या इच्छा संपूर्णपणे पूर्ण झालेल्या असतात (अवाप्त+काम). परंतु भक्तांना खूप इच्छा असतात (अत्यंत सकाम) व त्यांच्या इच्छा सदा अपूर्ण असतात (अतृप्त+काम). कोणी पुत्रसंतती मागतात, कोणी राज्यसंपत्ती मागतात, कोणी भावभक्ती मागतात तर एखादाच संसारातून मुक्ती मागतो. अशाच एका भावार्थी परंतु पैसा मिळविण्यात दंग असलेल्या भक्ताला बाबांची उदंड कीर्ती ऐकून त्यांच्या दर्शनाची ओढ लागली. घरी खूप संपत्ती व संतती होती. नोकरचाकरही पुष्कळ (अपरिमित) होते. त्याच्या मनात आले की उदारमूर्ती बाबांचे दर्शन घ्यावे. बाबा मोठे ब्रह्मज्ञानी आहेत. साधुसंतांचे मुकुटमणी आहेत. त्यांची करणी अगाध आहे. त्यांच्या चरणी मस्तक ठेवूया. आपल्याला दुसरी कसली कमी (दुजी वाण) नाही, म्हणून आपण ब्रह्मज्ञान मागूया. हे सहज साधले तर मी धन्य होईन. त्यावर त्याचे मित्र म्हणाले, ''ब्रह्म जाणणे सोपे नाही. ते तुझ्यासारख्या लोभ्याला प्रगट होणे कठीण (दुर्घट) आहे. धन, स्त्री व मुलेबाळे (द्रव्य+दारा+सुतां) यांच्या पलीकडे ज्याला सुखाचे साधन माहीत नाही, ज्याला ब्रह्म हे केवळ स्वप्नच (भ्रांती) वाटते, त्याला ते शांती कशी देईल! इंद्रिये (बाह्य वस्तु जाणणारी शक्ती) दुर्बल (क्षीण) झाली व जगात कोणी मान देईनासे झाले की (काही लोक) उगाच रिकामटेकडे बसल्यावर ब्रह्माचे सूत कातताल (वेळ घालविण्यासाठी ब्रह्म जाणण्याचा प्रयत्न करतात.), तशी ही तुझी ब्रह्म जाणण्याची इच्छा आहे. तुझ्या चिकट हातातून हा पैसा सुटल्याशिवाय तुझी ही इच्छा (धिंवसा) पुरविणारा तुला कोणी भेटावयाचा नाही.'' (ओ. २१-३२)

असो. अशी आस्था मनात धरून तो ब्रह्मार्थी परत-भाड्याचा टांगा करून शिरडीला निघाला व तेथे पोहोचल्यावर त्याने साईंचे दर्शन घेतले व त्यांच्या पायांना नमस्कार केला. मग साई जे गोड शब्द म्हणाले ते आता श्रोत्यांनी ऐकावेत. हा साईकथारूपी कल्पवृक्ष लक्ष देण्याच्या रूपाचे पाणी पाजल्याने (अवधान+पय+पानें) पक्का रुजेल (सधरू) आणि श्रोत्यांचा आदर जसा जसा वाढेल तसा तसा त्यावर फळांचा भार उगवेल. सर्वांगी तो रसभावाने भरेल, सुगंधित पुष्पांनी फुलेल, मधुर फळांच्या भाराने वाकेल (लवेल) आणि भोक्त्यांची (फळे खाण्याची किंवा कथा ऐकण्याची आसक्ती असणाऱ्यांची) इच्छा पूर्ण होईल. ब्रह्मार्थी म्हणाला, ''बाबा! मला ब्रह्म दाखवा. हेच जीवाशी धरून मी येथे आलो आहे. लोक म्हणतात, शिरडीकर बाबा ब्रह्म चटकन दाखवितात. म्हणून इतक्या दूर आलो. मार्ग कंठता फार थकलो. तरी जर ब्रह्म मिळेल तर कृतकृत्य झालो म्हणेन.'' बाबा म्हणाले, ''चिंता करू नकोस. ब्रह्म आता रोकड दाखवितो. येथे उधारीची गोष्ट नाही. तुझ्यासारखा विचारणाराच मिळणे कठीण. बहुतेक लोक धनसंपत्ती मागतात, रोग व संकटे निवारा म्हणतात आणि सदा लौकिक, मान, राज्यपद (सरकारी नोकरीतील सत्तेचे स्थान) व सुख मागतात. केवळ या जगातील (ऐहिक) सुखासाठी लोक शिरडीला धावून येतात व माझ्या फकिराच्या भजनी लागतात. ब्रह्म कोणीही मागत नाही. अशांचाच मला सुकाळ (सुबत्ता, विपुलता) आहे व तुझ्यासारख्यांचाच दुकाळ (दुष्काळ) आहे. ब्रह्मजिज्ञासूंचा मी भुकेला आहे. हा मला पर्वकाळ (चांगली संधी) आहे. ज्या ब्रह्मवस्तूच्या भीतीने सूर्य व चंद्र यांचे (रवि+शशींचे) टराविकपणे (नियत) चालणे, नियमाने उगवणे व नियमाने मावळणे; (दिवसाचा) प्रकाश व (रात्रीचा) अंधार मर्यादित (नेमस्त) राहणे; ग्रीष्म, वसंत वगैरे ऋतू येणे; इंद्रदेवादि लोकपाळ (आठ दिशांमध्ये लोकांचे हितरक्षण करण्यासाठी परमेश्वराने नेमलेले अधिकारी. इंद्र, अग्नी, यम, नैऋत, वरुण, कुबेर, वायु व ईश) यांनी नेमाने प्रजेचे पालन करणे; हे सर्व घडते त्याला मूळ हे ब्रह्म. म्हणून शरीर पडण्यापूर्वी (विस्रसना+आधीं) विचारवंत पुरुष (सुधी) ब्रह्म प्राप्त करण्याचा पुरुषार्थ साधून घेतात. नाहीतर सतत (निरवधी) पुनर्जन्माचा फेरा निश्चितपणे पाठीशी लागतो. हे ब्रह्म जाणल्याशिवाय जर शरीर पडले तर संसाराचे बंधन पिच्छा पुरवील व पुनर्जन्म चुकणार नाही. (पहा कठोपनिषद, अ. २, वल्ली ३, मंत्र ३-४— **भयादस्याग्निस्तपति, भयात् तपति सूर्यः। भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पञ्चमः ॥** ज्याच्या भीतीने अग्नी तापतो, सूर्य प्रकाशतो, ज्याच्या भीतीने इन्द्र, वायु आणि पाचवा मृत्यू आपापल्या कामात तत्पर असतात, **इह चेदशकद बोद्धुं प्राक् शरीरस्य**

**विस्रसः। ततः सर्गेषु लोकेषु** शरीरत्वाय कल्पते॥ त्या परब्रह्माला शरीराचे पतन होण्याआधी या देहातच जर जाणले नाही तर अनेक युगांपर्यंत नाना लोकांत व योनींत शरीर धारण करावे लागते.) तुला ब्रह्मच काय पण सगळे ब्रह्मगुंडाळे (ज्याच्यात ब्रह्माचा गड्डा अथवा सार गुंडाळलेले आहे ते) दाखवितो. तेच तुला नखापासून शेंडीपर्यंत (नख+शिखा+अन्त) घट्ट गुंडाळीत आहे व तेच मी उकलून वेगळे करतो.'' काय ती अमृताच्या गोडीची वाणी! जणूकाय अनुपम किंवा सर्वश्रेष्ठ (अद्वैत) सुखाची खाणच. जे प्राणी संशयरूपी झोक्यावर बसलेले (दोल+आरुढ) आहेत त्यांचाही उद्धार करण्यास ती समर्थ आहे. तात्पुरता आनंद देणाऱ्या (आपात+रमणीय) सुखाच्या मोहात जे दिवसरात्र गुंतलेले आहेत त्यांनाही बाबांची ही वचनरूपी वाट शास्त्रांनी योग्य म्हटलेल्या (विहित) आचरणाकडे नेऊन सोडील. चिंतामणी प्रसन्न झाला तर लौकिक (लोकांत प्रसिद्ध असलेले प्रापंचिक) सुख हाताशी चढेल आणि महेन्द्र प्रसन्न झाला तर स्वर्गसंपत्ती लाभेल. परंतु गुरुची विशेषता याहूनही विशेष (खास) आहे. गुरुसारखा दाता (देणारा) कोणी नाही. तो जर सुप्रसन्न होऊन पावला तर प्राप्त होण्यास कठीण (दुर्लभ) असे ब्रह्मच भक्ताला दाखवील. या गोड कथेच्या श्रवणाने संसारदु:खाचा विसर पडेल. ब्रह्मार्थियांना कसे शिकवावे, हे बाबा जाणत होते. (ओ. ३३-५२)

असो. बाबांनी मग त्या ब्रह्मार्थीला बसविले व क्षणभर दुसऱ्या व्यवसायात गुंतविले; जणूकाय तो प्रश्नच आपण विसरलो, असे त्यास दाखविले. मग बाबांनी काय केले? एका मुलाला जवळ बोलाविले व त्याला म्हणाले, ''लवकर जा व नंदू मारवाड्याला निरोप दे की बाबांना फार जरुर आहे, पाच रुपये थोडावेळ उसने चटकन दे.'' मुलगा नंदूच्या घरी गेला तर त्याच्या दाराला कुलूप होते. तेव्हा तसाच माघारी येऊन त्याने बाबांस ती बातमी सांगितली. बाबा म्हणाले, ''परत जा. बाळावाणी घरी असेल. त्याला तोच निरोप देऊन रुपये घेऊन ये.'' परंतु त्याची हीसुद्धा फेरी व्यर्थ गेली. बाळावाणीही तेव्हा घरी नव्हता. मुलाने येऊन हे घडलेले बाबांना सांगितले. नंतर आणखी एक-दोन ठिकाणी बाबांनी त्याला घाईने धाडले. (तेथेदेखील) हेलपाट्यांपायी (व्यर्थ खेपा घालून) तो थकला, परंतु कवडीसुद्धा मिळाली नाही. नंदू व बाळावाणी यांपैकी कोणीही घरी नव्हते, हे बाबांना पूर्णपणे माहीत होते. अंतर्ज्ञानीच होते ना महाराज! चालते बोलते ते ब्रह्म. त्यांना काय पाच रुपयांस अडेल! परंतु त्या ब्रह्मार्थियापायी ही नवलाई मांडिली. पाहुणा घरी आल्यावर त्याच्या पाहुणचारासाठी जे मिष्टान्न (गोड जेवण) किंवा शिरा केलेला असतो तो इतरांनापण खायला मिळतो. तसे या ब्रह्मभोक्त्याचे निमित्त पुढे करून महाराजांनी सर्वांच्या कल्याणासाठी भक्तांना उपदेश केला. त्या ब्रह्मार्थीच्या खिशांत त्यावेळी दोनशे पन्नास (पन्नास+दोन शते) रुपयांचे पुडके होते, ते साईनाथांना कळले होते. ब्रह्मार्थीला हे कळत नव्हते का! त्याला डोळे नव्हते का! खिशात नोटांचे पुडके (भेंडोळे) असून तो (द्यावे की न द्यावे? परत मिळतील की नाही? अशाप्रकारच्या अनिर्णयाचा) घोटाळा पडून (विकल्प+घोळे) अडचणीत पडला (नाडला). साईबाबांना पाच रुपड्या उधार आणि त्याही एक घटकाभर द्यावयाचा धीर झाला नाही आणि ब्रह्मसाक्षात्कार मागायला येतो!!! साई महाराज सत्यवचनी व हातउसनी रक्कमही लहान, तर ती देऊन पहावी, असे त्याच्या मनात येताच संशय येऊन आदळला. पाच रुपयांची ती काय कथा! पण तेही द्यावयाला ज्याचा जीव होत नाही, एवढीपण सोय करता येत नाही, तो मूर्तिमंत लोभच जन्मला नाही का! इतर कोणी भोळाभाळा ज्याला बाबांचा खरा जिव्हाळा असता त्याने हा उसनवारीचा सोहळा उघड्या डोळ्यांनी बघितला नसता. ब्रह्माची ज्याला इतकी तहान लागली होती त्याला हा प्रश्न समजला नसेल, असे मला नाही वाटत. परंतु तो धनाच्या मोहाने झपाटलेला होता. स्वस्थ बसावे तर तेही नाही. परंतु जाण्याची घाई सुटली. बाबांना म्हणाला, ''ब्रह्म ठिकाणी पाडा की!'' (ओ. ५३-७१)

बाबा म्हणाले, ''बसल्या जागी ब्रह्म दाखवावे यासाठीच आतापर्यंत उपाय केले ते कळले नाही का तुम्हाला? ब्रह्मासाठी पाच प्राण, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये (पंच+पंच+इंद्रिय+ज्ञान), अहंकार, बुद्धी व मन ही सर्व समर्पण करावी लागतात.''

(पहा कठोपनिषद्, अध्याय २, वल्ली ३— **यदा पञ्चावतिष्ठन्ते, ज्ञानानि मनसा सह। बुद्धिश्च न विचेष्टति, तमाहु: परमां गतिम्॥१०॥** योगाभ्यास करताना जेव्हा मनासहित पाचही इंद्रिये चांगल्याप्रकारे स्थिर होतात व बुद्धीसुद्धा कोणत्याही प्रकारची चेष्टा करत नाही त्या स्थितीला योगीजन परमगती, म्हणजे योगाची सर्वश्रेष्ठ स्थिती म्हणतात.) ब्रह्मज्ञानाचा मार्ग अवघड असतो. सर्वांना सरसकट सोपा नसतो. उदयकाळ आला म्हणजे भाग्यवंताला ते ब्रह्मज्ञान एकाएकी (अवचट) प्रगट होऊन प्राप्त होते. ब्रह्मदेवाच्या अधिकारापर्यंतच्या (हिरण्यगर्भ+पदापर्यंत) उत्कर्षाविषयीदेखील जो विरक्त असतो व ज्याची इतर कोठेही आसक्ती नसते, तोच ही ब्रह्मविद्या प्राप्त करण्याचा अधिकारी असतो. (याबद्दलची दोन उत्कृष्ट उदाहरणे आपल्या उपनिषदांमध्ये आहेत. पहिले कठोपनिषदात आहे. नचिकेत नावाचा मुलगा यमाकडे जातो व जन्ममृत्यूवर विजय प्राप्त करविणाऱ्या मोक्षाच्या साधनेबद्दल प्रश्न विचारतो. तेव्हा यमराज त्याला हत्ती, घोडे, रथ, सोने, नाचगाणाऱ्या अप्सरा, एवढेच काय अनंत काळपर्यंतचे साम्राज्यही देण्याचे आमिष दाखवून त्याला हा प्रश्न विचारण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याला त्या लहान मुलाने काय उत्तर द्यावे! **श्वोभावा मर्त्यस्य यदन्तकैतत्, सर्वेन्द्रियाणां जरयन्ति तेज:। अपि सर्वं जीवितमल्पमेव, तवैव वाहास्तव नृत्यगीते॥ कठो., १-१-२६॥** ''हे यमराजा! आपण वर्णन केलेले सर्व भोग क्षणभंगूर आहेत व माणसांच्या इंद्रियांची शक्ती

नष्ट करतात. तसेच माणसांचे समस्त आयुष्यही, मग ते कितीही मोठे असो, अगदी थोडेच असते. तेव्हा हे आपले रथ, हत्ती, घोडे व नाचगाणाऱ्या अप्सरा आपल्याजवळच राहू द्या (मला नकोत).'' दुसरे उदाहरण बृहदारण्यक उपनिषदात आहे. याज्ञवल्क्य ऋषींना दोन स्त्रिया होत्या. एक कात्यायनी व दुसरी मैत्रेयी. कात्यायनी संसारी स्त्री होती तर मैत्रेयी विद्वान होती. याज्ञवल्क्य ऋषींनी संन्यास घ्यावयाचे ठरविले व दोन्ही स्त्रियांना बोलावून सांगितले की माझी संपत्ती मी तुम्हा दोघींत वाटून देतो. त्यावर कात्यायनी काही बोलली नाही. परंतु मैत्रेयीने विचारले, **यन्नु म इयं भगो: सर्वा पृथिवीं वित्तेन पूर्णा स्यात्कथं तेनामृता स्याम्। येनाहं नामृता स्यां किमहं तेन कुर्यां, यदेव भगवान्वेद तदेव मे ब्रूहि॥ बृहदारण्यक, उप., अ. २, ब्रा. ४, मंत्र २-३॥** ''भगवान! जरी या सर्व संपत्तीसह पृथ्वी माझी झाली तरी त्यामुळे मी अमर (न मरणारी, मोक्ष पावलेली) कशी होऊ शकेन? ज्याच्यामुळे मी अमर होऊ शकत नाही, ते घेऊन मी काय करू? आपण जे काही अमृतत्वाच्या (मोक्षाच्या) साधनविषयी जाणता ते मला सांगा.'' अर्थात् ह्या दोन्ही उत्तमाधिकाऱ्यांना, म्हणजे नचिकेत व मैत्रेयी यांना अनुक्रमे यमाने व याज्ञवल्क्य ऋषींनी प्रसन्न होऊन ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला, यात शंका नाही.) अंगात किंचितही वैराग्य नसेल त्याला कोणीही कितीही ब्रह्मतत्वाचा उपदेश केला तरी त्याला काय यश येईल! उत्तम अधिकार (पात्रता) असलेल्यांना ब्रह्मज्ञान विनाअडचण सहज (अबाधित ब्रह्म+बोधन) प्राप्त होते तर मध्यम अधिकार असलेल्यांना सदा ठराविक पद्धतीने हळूहळू (परंपरा+आधीन) जावे लागते. एक आकाशमार्गाने (विहंगम+मार्ग+सेवने) जातात तर दुसरे शास्त्रसंमत क्रमाक्रमाने पायऱ्या चढून (परंपरा+सोपान) जातात. परंतु अधिकार (पात्रता) नसलेले लोक मात्र ब्रह्म जाणण्याकरिता व्यर्थ श्रम (वावगा शीण) करतात. एका आत्मविवेकाशिवाय (आत्मसंयमाशिवाय, म्हणजे इंद्रिये व विकार ताब्यात आणण्याशिवाय) ब्रह्मप्राप्तीचे दुसरे श्रेष्ठ (निरतिशय) साधन नाही, हे वेदान्ताचे वचन जरी खरे असले तरी ते (आत्मविवेक प्राप्त करणे) काय सर्वांनाच शक्य होते! अभ्यास व श्रम करून हाडांच्या काड्या (कांडे) कराव्या लागतात (शरीर वाळवावे लागते). तेव्हाच गुरुकृपेच्या प्रगट होण्याने (उजियेडे) हळूहळू ते हाताशी येते. (ओ. ७२-८०)

मी एक ईश्वर, मीच एक सत्ता गाजविणारा अधिपती (नियंता) असा जेव्हा ब्रह्मदेवाला (हिरण्यगर्भाला) अभिमान (अहंता) चढतो व स्वत:च्या स्वरूपाचा विसर पडतो तेव्हा विश्वाची उत्पत्ती (प्रादुर्भूतता) होते. **''मीच ब्रह्म आहे''** (ब्रह्म+अहं+अस्मि+इति) असे जेव्हा ज्ञान होते तेव्हा ते जाणणारा ज्ञानी स्वस्वरूपी लीन होतो व तेव्हाच त्याची विश्वाच्या वास्तविकतेची किंवा खरेपणाची कल्पना नाहीशी होते (विश्व+आभास+विसर्जन), असे श्रुती (वेद) गर्जना करून सांगते. आत्मजागृती (स्व+प्रबोध+उत्पत्ति) झाली आणि सर्वव्यापी व सर्वांगभूत अशा ब्रह्माशी एकरूपतेची मनाची वृत्ती (ब्रह्म+आकार+अंत:करण+वृत्ति) झाली की ब्रह्मरूपी अग्नीत विश्वाची आहुती पडते व सृष्टीची राख (विभूति) होते (लय होतो). जीवाचीदेखील हीच तऱ्हा असते. जेव्हा चुकीचा समज नाहीसा होतो (भ्रम+निवृत्ति), तेव्हा दोर (रज्जू), सूर्याचे किरण व शिंपला (शुक्ति) यांचा खोटा आभास निवळतो. शिंपल्याचे खरे ज्ञान नसल्यामुळे (शुक्ति+अज्ञान) ते रुपे किंवा चांदी भासू लागते (रजत+भान). परंतु तेच (भासणाऱ्या) रुप्याचे खरे ज्ञान प्राप्त झाले (रजत+ज्ञान) की ते शिंपलाच आहे, हे कळते (शुक्ति+ज्ञान). खोट्या कल्पनेचे (भ्रमाचे) निवारण झाले की रुपे दिसेनासे होते (रौप्य+अवसान) व शिंपल्याचे स्पष्ट व निश्चित ज्ञान होते (शुक्ति+विज्ञान निर्भेळ). एकमेकांच्या अज्ञानाचे (मोहाचे) हे लक्षण आहे. ज्ञानरूपी दीप घासून स्वच्छ करून अज्ञानरूपी घाण (मल) धुऊन काढा; म्हणजे चुकीच्या कल्पनेचा (भ्रमाचा) नाश होईल (प्रतिभासा निर्दळण). (ओ. ८१-८६)

जन्ममृत्यूंचे बंधन नसेल तर मोक्षासाठी आत्मसंयमन कशाला? वेदान्ताशी आमचा काय संबंध? (कशाला त्यांचा अभ्यास करावयाचा?) आणि मग हे (ब्रह्मज्ञानाचे) विवेचन (प्रबंध) कशासाठी? मी (संसारात) बांधलेलो (बद्ध) आहे व मला त्यापासून संपूर्णपणे सुटायचे आहे (व्हावे निर्मुक्त), अशा दृढनिश्चयाला जो चिकटलेला आहे, तोच फक्त येथील अधिकारी आहे. अत्यंत अज्ञानी (अति+अज्ञ) अथवा पूर्ण ज्ञानी (तत्+ज्ञानी) हे दोघेही अधिकारी (पात्र) नव्हेत. बद्धच नाही तर मुक्ती कसली, ही खरी गोष्ट (वस्तु+स्थिती) आहे. (जीव हा ब्रह्मच आहे. **''जीवो ब्रह्मैव न पर:''** स्वभावत:च तो नित्य, शुद्ध, बुद्ध व मुक्त असतो. म्हणून **''बद्धच नाही कैंचि मुक्ति। हें तों आहे वस्तुस्थिति॥''**) बद्धता व मुक्तता ही दोन्ही गुणांच्या (सत्त्व, रज व तम गुणांच्या) सोबतीने राहण्यावर अवलंबून (गुण+संगाती) असतात. ब्रह्म जेव्हा मायेशी किंवा त्रिगुणात्मक प्रकृतीशी (पहा गीता, अ. ७– **दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया॥१४॥**) संबंध जोडते तेव्हा ते आपल्याला बद्ध झालेले समजते. म्हणून गुणसंयोग म्हणजे बन्धन आणि गुणवियोग (गुणातीत किंवा निस्त्रैगुण्य) म्हणजे मोक्ष हा याचा अनुभव सर्वांना आहेच. दुजेपणाचे जेथे अस्तित्वच नाही (द्वितियाचा अभाव) तेथे कोण कोणास बांधेल व सोडेल? **(भयं द्वितीयाभिनिदेशत: स्यात्** – दुजेपणाचे अस्तित्व दाखविणे, हे भीतीला कारण होते.) जीवात्म्याचा परमात्म्याशी दुजाभाव (द्वैत) एकोप्याच्या मार्गाने (अद्वैतें) गेल्यावर कोणीही बद्ध नाही व मुक्तही नाही. दिवस आणि रात्र (दिवा+रजनी) हे काय सूर्य (दिनकर) उत्पन्न करतो? हा तर दृष्टीदोषाचा व्यवहार. सूर्य (दिवाकर) या भानगडीतच नसतो (अलिप्त). मी एक कर्ता, मी एक भोक्ता (भोग भोगणारा), असा चित्तात अभिमान

धरून स्वर्ग व नरकाच्या सुखदु:खांचा अनुभव घेतला की इच्छांचा हव्यास (वासना+आसक्तता) वाढतो. (ओ. ८७-९२)

आत्मा हा सदा असणारा नित्य, प्राचीन (पुराण) व कधीही नाश न पावणारा (शाश्वत) आहे. जन्म, मृत्यू, विकार (बदल) त्याला बाधत नाहीत (पहा कठोपनिषद, २-२-१८ व गीता, २-२०—**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो, न हन्यते हन्यमाने शरीरे॥**) ॐ कार हे त्याचे मूर्त स्वरूप (प्रतीक) आहे. त्याला आरंभ व शेवट नसून (अनादि+अनंत) स्वतंत्र (सतत) आहे. ज्याची (मनुष्याची) शरीर हाच आत्मा, अशी दृष्टी आहे, जो स्वत:ला वेगळा व सृष्टीला वेगळी समजतो त्याला कष्ट करूनही आत्म्याचे अनुभवजन्य ज्ञान प्राप्त होत नाही (परामृष्टि लाधेना). वाणी आदी सर्व इंद्रियांचा लय करा व मनाचा निश्चय पक्का करा. नंतर त्या मनाचाही लय (क्षय) करून बुद्धीला पकडा. प्रकाशस्वरूप जी ज्ञान देणारी बुद्धी तेथे मन एकाग्र करा (समाधि लावा). मनासकट सर्व इंद्रियसमूह एका बुद्धीच्या स्वाधीन असतात. मातीच्या घड्याला (घटासी) जशी मूळ (आद्य) कारण माती तशीच इंद्रियांना बुद्धी असते. ती तशीच त्यांना सदा व्यापून असते. मनादि सर्व इंद्रियांना व्यापून राहणाऱ्या बुद्धीला महत्तत्वात (समष्टि किंवा समूह बुद्धीत, म्हणजे सर्वव्यापी ईश्वरस्वरूपात) मिसळावे व महत्तत्व आत्म्यात (आत्मतत्वीं) समर्पावे. अशी गोळाबेरीज केली म्हणजे आत्म्याचे स्वरूप निश्चितपणे कळते. (पहा कठोपनिषद, अ. १, वल्ली ३, मंत्र १३— **यच्छेत् वाङ्मनसी प्राज्ञ:, तत् यच्छेत् ज्ञान आत्मनि। ज्ञानमात्मनि महति नियच्छेत, तत् यच्छेत् शान्त आत्मनि॥१३॥** बुद्धिमान मनुष्याने प्रथम वाणी वगैरे इंद्रियांना आपल्या विषयांपासून परावृत्त करून मनात विलीन करावे. मग मनाला बुद्धीत विलीन करावे. येथपर्यंत दृढ अभ्यास झाला म्हणजे या ज्ञानस्वरूप बुद्धीला 'महति आत्मनि', म्हणजे जीवात्म्याच्या शुद्ध स्वरूपात विलीन करावे. अशाप्रकारे आपल्यापासून वेगळ्या कुठल्याही वस्तूच्या सत्तेचे भान राहिले नाही म्हणजे स्वत:ला शान्त आत्मारूप परब्रह्म पुरुषोत्तमात विलीन करून टाकावे.) मग रुपे (चांदी), मृगजळ (वाळवंट अति उन्हाने तापून त्यावरच्या हवेच्या थरांचा पाण्यासारखा दिसणारा भास) व सापाचा आकार हे केवळ (शिंपला, सूर्याचे किरण व दोर याबद्दलचे) दृष्टीने दोष बनतात. ज्याला संपूर्णता नाही व विशेषताही नाही (अशेष+विशेष+रहित) आणि ज्याला जन्ममृत्यू बाधत नाहीत (जन्म+अपक्षय+विवर्जित) त्या आत्म्याच्या दर्शनाशिवाय आपले कल्याण होत नसते, असे साधुजन सतत बोलत असतात. सर्व परिणामांना (कार्यमात्रा) कारण (निमित्त) असते; परंतु हा आत्मा स्वत:च उत्पन्न झालेला (स्वयंभू) असून त्याला कारण नाही (निष्कारण). हा फार प्राचीन (पुराण) आहे; पण पूर्वी असूनही त्रिकालाबाधित असा ताजा (पुराऽपि नव) आहे आणि स्वभावत:च बुद्धीला अगोचर (बुद्धीहीन) आहे (बुद्धीच्या आवाक्याच्या बाहेर आहे). हा आकाशाप्रमाणे अभंग (अ+विच्छिन्न) असून जन्ममृत्यूच्या पलिकडला (विलक्षण) आहे. जो स्वत: एकटाच असलेला (निरालंबन) व अवयवाशिवायचा (निष्कल) आहे, त्याचा 'ॐ प्रणव' हा आधार (आलंबन) आहे. (ओ. ९३-१०२)

हे निर्गुण निराकार (पर) ब्रह्म जाणता येते (ज्ञातव्य), सगुण साकार (अपर) ब्रह्म प्राप्त करता येते (प्राप्तव्य) आणि त्याचे प्रतीक 'ॐ' याचे सदा ध्यान व उपासना करता येते. (ध्यातव्य उपासितव्य सर्वदा) सर्व वेदांचे जे सार तेच प्रणव (ब्रह्म) स्वरूप 'ॐ' कार व त्याने जे अर्थासह स्पष्ट जाणणे (निर्धार) तेच महावाक्यांचे (वेदांतील जीव व ब्रह्म यांचे ऐक्य दाखविणारी 'तत्वमसि' आदी वाक्ये. ही चार वेदांची सार आहेत. **प्रज्ञानं ब्रह्म, अहं ब्रह्माऽस्मि, तत् त्वमसि आणि अयमात्मा ब्रह्म.**) अभ्यासपूर्वक चिंतन (विचार) होय! वेद स्वत: ज्याच्या खरेपणाबद्दल खात्री देतात (प्रतिपादन करतात). जे (साधन करणारे) लोक अत्यंत प्रयत्नाने व ब्रह्मचर्य (स्त्रीसंग न करण्याचे व्रत) पाळून मिळवितात त्यालाच 'ॐ पद' (परमेश्वराचे परमपद) म्हणतात. (पहा कठोपनिषद, अ. १, वल्ली २, मंत्र १५— **सर्वे वेदा यत् पदमामनन्ति, तपाँऽसि सर्वाणि च यद् वदन्ति। यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति, तत्ते पदं संग्रेहण ब्रवीम्योमित्येतत्॥** सर्व वेद नानाप्रकारांनी ज्याचे प्रतिपादन करतात, सर्व तप वगैरे साधनांचे जे एक परम आणि चरम, म्हणजे अंतिम लक्ष्य आहे व ज्याला प्राप्त करण्याच्या इच्छेने साधक निष्ठापूर्वक ब्रह्मचर्याचे पालन करतात ते हे पुरुषोत्तम भगवंताचे परम तत्व मी तुला संक्षेपपूर्वक सांगतो. ते म्हणजे ॐ हे एक अक्षर होय!) असो. त्या पदाची वाटचाल जरी फार बिकट (दुर्गम) असली तरी ती मेहनत (अभ्यास) करणाऱ्याला श्रेष्ठ गुरुकृपा झाल्यावर मिळविण्यास अत्यंत सोपी (सुगम) होते. अत्यंत स्थूल अशा इंद्रियांपासून अनुक्रम धरून सूक्ष्म तारतम्यापर्यंत (नित्यानित्य विवेकापर्यंत) पोहोचल्यावर प्रयत्नशील साधकाला त्याची प्राप्ती होते. ते हे ॐ शब्दाने म्हणण्याचे (वाच्य) अक्षर सर्व तपांमध्ये (देवता प्रसन्न करण्याकरिता केलेल्या जप-तप इत्यादींच्या आचरणामध्ये) श्रेष्ठ (तपांचे सार) आहे, ज्याचा नुसता उच्चार केला तरी (ज्याच्या) अर्थाचे तत्व मनात स्फुरते आणि ज्याचे वारंवार पठण (आवर्तन) केले तर प्रत्यक्ष अनुभव येतो (साक्षात्कार होतो). (ओ. १०३-१०८)

सर्वव्यापी (अ+वि+परि+पूत) आणि वृद्धिक्षय विकाराशिवायचा (शून्य) आत्मा जो जाणेल तो सद्गुरुचा भक्त धन्य होय! अध्यात्म (ताप येणे, हाड मोडणे यांसारखे शारीरिक व क्रोध, चिंता यांसारखी मानसिक दु:खे), अधिभूत (चोर, साप, युद्ध यांपासून मिळणारी दु:खे) व अधिदैव (अतिवृष्टी, दुष्काळ यांसारखी दैविक दु:खे) ह्या तीन प्रकारच्या दु:खांनी (त्रिविध तापीं) गांजलेले लोक हे भाग्य कसे भोगू शकतील?

हे वैभव तर फक्त संतांचेच असते. अविद्येपासून (ब्रह्म व आत्मा हे वेगळे आहेत, अशा चुकीच्या समजुतीमुळे) संसाराची किंवा जन्ममरणादि परंपरेची (संसृति) उत्पत्ती होते व त्यापासून सुटका करून घ्यावयाचे साधन म्हणजे ब्रह्म व आत्मा हे एकच आहेत, अशी मनाची भावना (ब्रह्म+आत्मा+ऐक्य+वृत्ति), ज्याची प्राप्ती ह्या संतांच्या ठिकाणी होते. जेव्हा विषयसुखांच्या विचाराशिवायची (विषय+कल्पना+शून्य) मनाची स्थिती होईल, जेव्हा **'अहं ब्रह्मास्मि इति'** (मी ब्रह्म आहे अशा) वेदाच्या महावाक्याच्या पुन्हा पुन्हा उच्चार करण्याने (आवृत्तीने) बुद्धीचा तसा कल (प्रवृत्ति) होईल, जेव्हा गुरुच्या वचनाच्या आणि शास्त्रांच्या म्हणण्याच्या खरेपणाची खात्री पटून (प्रतीति) मनाने व शरीराने (अंतर्बाह्य) कर्म करण्याची प्रवृत्ती मनासह थांबते (शांत होते), तेव्हाच आत्म्याची पूर्णपणे ओळख होते (आत्म+संवित्ति लाभे). तेव्हाच संपूर्ण व स्पष्ट ज्ञानाची (सम्यक्+दर्शन) प्राप्ती होते, विषयसुखाची साधने, संपत्ती वगैरे शोकप्रद (जड) वस्तूंपासून निवृत्ती होते (त्याच्याकडील मनाची ओढ थांबते), अंतःकरणातील अविद्या वगैरेंची गुंतागुंत उकलली जाते (तुटे अविद्यादि हृदयग्रंथि) आणि साधक अव्यक्त परब्रह्मात (अव्यक्तीं) विलीन (प्रविष्ट) होतो. (ओ. १०९-११४)

कवडशातील (भोकातून येणाऱ्या उजेडाच्या किरणातील) अति लहान (सूक्ष्म) कण, त्याहूनही लहान असलेला अणू (लहान कण), त्या अणूपेक्षाही अतिशय लहान किंवा बारीक (अणीयान) आत्मा असतो, अशी त्याची निश्चित कल्पना (आत्मा+अनुमान+निर्धार) केली जाते. मोठ्यात मोठे म्हणजे ब्रह्मांड (चौदा भुवनांचे, म्हणजे सप्तलोक व सप्तपाताळाचे जग), पण आत्मा त्याहूनही मोठा (महिमान) आहे, अशीही कल्पना केली जाते. परंतु ह्या सर्व तुलनेसाठी (सापेक्ष) कल्पना आहेत. आत्मा हा निश्चित मापाच्या पलीकडे (प्रमाण+अतीत) आहे. तो सूक्ष्मत्वाने सूक्ष्मापेक्षा सूक्ष्म (अणोः+अणीयान्) आणि मोठेपणाने मोठ्यापेक्षा मोठ्या आकाराचा (महत्त्वें महत्+परिमाणयान) आहे. (पहा कठोपनिषद, अ. १, वल्ली २, मंत्र २० – **अणोरणीयान् महतो महीयान्, आत्माअस्य जन्तोर्निहितो गुहायाम्।।** या जीवात्म्याच्या हृदयरूप गुहेमध्ये राहणारा आत्मा सूक्ष्माहून अतिसूक्ष्म व महानपेक्षा अतिमहान आहे). नाम व रूप ह्या उपाधीच (स्वरूपाला इतर पदार्थांपासून भिन्न किंवा वेगळे करून दाखविणाऱ्या) असतात. आत्मा सदा परिपूर्ण (सवंध, म्हणजे ज्यात काही न्यून न राहिलेला) व उपाधिशिवायचा असतो. त्याला जन्म नाही, मरण नाही व मूळकारणही नाही. तो जन्मरहित किंवा स्वयंभू (अज), सतत टिकणारा (नित्य), कधीही नाश न पावणारा (शाश्वत) व पुरातन (पुराण) आहे (पहा मागील ओवी ९३ व त्यावरील टीका). त्याला स्पष्टपणे सहज जाणणे कठीण (निर्धारण दुर्गम) असते. ॐ कार प्रतीक असलेले जे ब्रह्म तेच त्याचे मूळ (परम) स्वरूप होय! वेद व इतर शास्त्रपुराणे (आगम निगम) यांनाही जाणण्यास कठीण (दुर्गम) असलेला तो काय सरसकट सर्वांना सहज प्राप्त (सुगम) होईल? ज्याला निश्चयपूर्वक जाणण्याला (निर्धारिता) वेद थकले, तपस्वी वनवासी झाले, उपनिषदांनी हात टेकले; पण कोणालाही अचूक ज्ञान (निदान) झाले नाही, त्या आत्म्याच्या स्वरूपाचा शोध लागण्याकरिता आत्मा व परमात्मा एकच आहेत, हे जाणणारा (अभेद+दर्शी) आचार्यच (गुरुच) हवा. तर्क करण्यात पटाईत असणाऱ्यांना (तार्किका) तेथे प्रवेश नसतो, मग इतरांचे काय महत्त्व (केवा)! नुसते वादविवाद करणाऱ्यांना तर तेथे जागाच नसते. ते मनाच्या गोंधळरूपी भोवऱ्यात (भ्रम+आवर्ती) गरगर फिरतील. वेदशास्त्र (आगम) व आचार्य (गुरु) यांशिवाय इतरांची स्वस्वरूप जाणण्याची बुद्धी (तत्त्वबुद्धी) तेथे निश्चित होत (स्थिरावत) नाही. स्वतःच्या बुद्धीचे कल्पनारूपी तारे (चांदण्या) चौऱ्यांशी लक्ष (पुनर्जन्माचे) फेरे चुकवू शकत नाहीत. पण शास्त्र व गुरुरूपी एकच चंद्र (आगम+आचार्य+इंदु) मात्र पुरतो आणि मग अंधार किंचितही (लवलेश) उरत नाही (तुं). जे इतरांना कष्टाने साधत नाही ते तो सहज साधून देतो. जे सद्गुरुची कास दृढ धरून ठेवतात त्यांना ब्रह्मज्ञान (सत्+विद्या) प्रगट होते (प्रकाशते). जेथे अविद्या (अज्ञान) काही न करता बाजूला सरते, जेथे सच्चिदानंदस्वरूप स्थिर होते व स्वस्वरूपात निमग्न झालेली स्थिती उत्पन्न होते (अवतरे) त्यालाच मोक्ष हे दुसरे नाव आहे. हेच जीवाचे अत्यंत अपेक्षित (अभीष्ट) ध्येय आहे, ज्याकरिता ब्रह्म, म्हणजे परमात्म्याशी एकरूप होण्याची आसक्ती असलेले (ब्रह्मयोगी) व आत्मचिंतनात निमग्न होण्याची आवड असलेले (अंतर्निष्ठ) साधक फार कष्ट करतात. स्वस्वरूपी मन अस्थिर (चंचल) झाले की इंद्रियांनी भोगण्याच्या विषयांची खळबळ उडते. स्वस्वरूपी मन स्थिर (निश्चळ) झाले की ते क्षीण होतात (येई विकळता). जो स्वस्वरूपापासून तोंड फिरवितो (विन्मुख) त्याच्यासमोर विषय सदा उभे राहतात (सन्मुख); पण जो स्वस्वरूपाकडे पाहतो त्याच्यापासून विषय तोंड फिरवितात (दूर पळतात). जो मोक्षाचीच मात्र इच्छा करतो, दुसरी कसलीही इच्छा मनात ठेवत नाही (अन्यार्थी निरिच्छ अभ्यंतरी) आणि या पृथ्वीलोकाचा व परलोकाचा (इह+परत्र+अर्थ) किंचितही लोभ (तृष्णा+लेश) धरत नाही, तोच मोक्षाचा अधिकारी असतो. यातील एका लक्षणाने जरी कोणी कमी (उणा) असेल तरी तो मुमुक्षू (मोक्षाची इच्छा करणारा) नव्हे, हे स्पष्ट जाणा. एका डोळ्याने आंधळा (काणा) माणूस देखणेपणाचे जसे ढोंग करतो तसा तो मुमुक्षत्वाचे केवळ ढोंग करतो. अहंकार (मीच सर्व कृतींचा कर्ता आहे असा अभिमान) गळाल्याशिवाय, लोभाचे उच्चाटन झाल्याशिवाय व मन आसक्तीरहित (निर्वासन) झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान मनात पक्के ठसत नाही. देह हाच आत्मा आहे, अशी जी बुद्धी तीच माणसाला भ्रमात टाकते (देह+आत्म+बुद्धि हेच भ्रांति); कुठल्याही वस्तुविषयी आसक्ती असणे, हेच बंधनाला कारण होते. विषयभोगांविषयी कल्पना

करणे व आठवण येऊ देणे (स्मूर्ति) सोडा म्हणजे ब्रह्म हाती येईल. निर्गुण (निर्विशेष) परब्रह्माचा साक्षात्कार मिळविणे कठीण कर्म आहे म्हणून सगुण (सविशेष) अपर ब्रह्माच्या वर्णनाचे वर्म जाणून बुद्धिमान लोक (धीमंद) त्यालाच आपला धर्म (ईश्वरावरील श्रद्धेचा व उपासनेचा मार्ग) समजतात. (ओ. ११५-१३३)

''आत्मा (परमात्मा) सर्व भूतांमध्ये गुप्तरीतीने वास करतो'' हे तत्व वेदांती जाणतात. परंतु याचा सर्वांनाच अनुभव येईल, असा पुरावा (प्रतीति) कोठे आहे! आधी चित्त शुद्ध लागते, आणखी बुद्धी दर्भाच्या टोकासारखी तीक्ष्ण (कुशाग्र) लागते; तेव्हाच हा अत्यंत पवित्र आत्मा कृपावंत होऊन स्वतःच प्रगट होतो. आत्मा सदा (जन्म, वृद्धी, नाश वगैरे) विकाराशिवायचा (अविकृत) आहे. ज्याला आत्मज्ञान प्राप्त झाले आहे (आत्म+विद) तो कधीही शोक (दुःख) करत नसतो (पहा गीता, अ. २, श्लो. ११ – **गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः।** खरे ज्ञानी मेल्या-जित्यांचा शोक करीत नसतात) आणि तोच (खरा) धैर्यवान व बुद्धिवान (धीमंत) असून संसारातून संपूर्णपणे मुक्त झालेला (भव+निर्मुक्त) असतो. येथे प्रवचन करण्याचे कौशल्य (युक्ति) किंवा ग्रंथाचा अर्थ समजण्याची शक्ती चालत नसते. वेद व श्रुती यांच्या यथार्थ ज्ञानानेही काही उलगडा (उपपत्ति) होत नसतो. (पहा कठोपनिषद, अ. १, वल्ली २, मंत्र २३ – **नायमात्मा प्रवचेन लभ्यो, न मेधया न बहुना श्रुतेन। यमेवैषवृणुते तेन लभ्यः, तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम्॥** हा आत्मा, म्हणजे परब्रह्म परमात्मा प्रवचनाने, बुद्धीने किंवा पुष्कळ शास्त्र श्रवण केल्यानेही प्राप्त करणे शक्य नसते. तो ज्याचा स्वीकार करतो त्यालाच तो प्राप्त होऊ शकतो. त्याच्यासाठी तो आत्मा स्वतःच आपले खरे स्वरूप प्रगट करतो). आत्मा नित्य व विकाराशिवायचा आहे आणि शरीर अनित्य (सतत न टिकणारे) व सदा बदलणारे (अन्+अवस्थित), असे जाणून जो आपले हित साधतो तोच योग्य व अयोग्य (विहित+अविहित) कार्याविषयी जागृत (दक्ष) होय! आत्मज्ञानीला सदा कसलीच भीती नसते. तो स्वतःला एकेकटाच व या जगात स्वतःशिवाय दुसरे काही नाहीच, असे समजतो. (अशाप्रकारे) दुजेपणाचा ठावठिकाणाच पुसून काढला की सर्व दुःखांचा नाश (शोक+अत्यय) निश्चित फळास येतो. आत्मा जरी जाणण्यास अवघड (दुर्विज्ञेय) असला, प्रवचने (कीर्तने) ऐकून त्याचा ठिकाणा सापडत नसला किंवा केवळ बुद्धीचा तेथे काही उपयोग होत नसला, तरी त्या आत्म्याला (योग्य) उपायांनी सहज जाणणे शक्य असते. ज्याला स्वतःला इतर कुठली कामना (इच्छा) नाही व ज्याची आत्मज्ञान प्राप्त करणे, हीच मात्र एक कामना आहे, असा जो आत्म्याची पुष्कळ (प्रकाम) प्रार्थना करतो त्यालाच हा श्रेष्ठ लाभ प्राप्त होतो (आत्मज्ञान प्राप्त होते). पोथी, कीर्तन वगैरे ऐकताना 'तोच मी आहे' अशा अभेद दृष्टीने जो पाहतो व हेच ज्याचे ध्यान (अनुसंधान) राहते, त्यावर आत्मा अनुग्रह (कृपा) करतो. जो सदा दुष्ट कृत्ये किंवा पापाचरणे करण्यास तत्पर (दुश्चरित+आसक्त) असतो, जो सदा अशान्त व अस्थिर (असमाहित) असतो, ज्याचे चित्त एकाग्र नसते, अशा ज्ञानी माणसालाही तो पावत नाही. (पहा कठोपनिषद, अ. १, वल्ली २, मंत्र २४ – **नाविरतो दुश्चरितान्नाशान्तो नासमाहितः। नाशान्तमानसो वापि प्रज्ञानेनैनमाप्नुयात्॥** जो मनुष्य दुष्टकृत्यांपासून किंवा पापाचरणांपासून विरक्त होऊन त्यांचा त्याग करत नाही, ज्याचे मन ईश्वराला विसरून रात्रंदिवस संसारातील भोगांत भटकत राहते, ईश्वरावर श्रद्धा नसल्याने जो सदा अशान्त राहतो व ज्याची मन, बुद्धी व इंद्रिये स्वाधीन नाहीत, असा मनुष्य सूक्ष्म बुद्धीने आत्मचिंतन करत असूनही त्याला प्राप्त करू शकत नाही.) श्रुति व स्मृती (वेद व धर्मशास्त्रे) यांनी सांगितलेली योग्य (विहित) कर्मे जो करतो व अयोग्य (अविहित) कर्मे सोडून देतो, ज्याचे चित्त सदा एकाग्र (समाहित) असते, त्याच्या आधीन आत्मा असतो. पापाचरणापासून जो विरक्त (विरत), आचार्य व गुरु यांच्या चरणी जो विनम्र व फलाच्या इच्छेपासून जो निवृत्त त्यालाच हा आत्मा प्राप्त होतो. विषयभोगांविषयी निष्काम झाल्याशिवाय, केवळ आत्म्याविषयी कामना धरल्याशिवाय आणि मनाची वृत्ती शांत झाल्याशिवाय आत्माराम पावणे कठीण असते. ब्रह्मज्ञानाची इच्छा असणाऱ्याचे (जिज्ञासूचे) तपाचरण पाहून जेव्हा आत्म्यास कृपा उपजेल, तेव्हाच तो स्वतःचे स्वरूप प्रगट करेल. गुरुच्या मदतीशिवाय त्याला पावणे सोपे नाही. तरी स्वस्वरूप प्राप्त करण्यासाठी साधकाने श्रवण, मनन वगैरे करावे, अभेद भावाचे नीट ध्यान (अनुसंधान) ठेवावे, तरच आत्मलाभ सुखाने होईल. प्रपंच हा सर्व अज्ञानमय (मायामोहाने भरलेला) आहे व त्याच्या पसाऱ्याचेही मूळ कारण अज्ञान (चुकीचे ज्ञान) आहे. ज्ञानाशिवाय मोक्षाला थारा (आधार) नाही, हे जरा समजून घ्या. शास्त्राच्या अनुभवाला (प्रचिती यावयाला) तर्क आणि शोधकबुद्धी (अनुमान आणि युक्ति) लागते. ज्ञान मात्र संसाराचा लय (विसर) झाल्यावरच उत्पन्न होते, दुसऱ्या कशानेही शक्य नसते (असंभव अन्यथा). मोठा साधू (महात्मा) असो की नीच पापी (पापात्मा) असो, (प्रत्येक) जीवात्मा हाच परमात्मा (परमेश्वर) आहे, हे जाणून जो वागतो तोच खरा महान पुरुष (महात्मा) होय! त्याचाच एक आत्मा अभेदात्मा (आत्मा व परमात्मा यांत भेद न समजणारा) असतो. ब्रह्म व आत्मा एक आहेत हे जे अनुभवपूर्वक ज्ञान (ब्रह्म+आत्मा+एकत्व विज्ञान) तोच ज्ञानाचा कळस (परि+अवसान) होय! एकदा आत्मज्ञान झाले की सर्व अज्ञान नाहीसे होते. संपूर्ण आत्मज्ञान झाले की मग जाणण्यासारखे (अवगंतव्य) काहीच उरत नाही (न+उरे). साक्षात्कारामुळे (स्वतः प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे) त्याच्याकडून हातातल्या वस्तूंप्रमाणे (कर+तल+गत वस्तुजात) सारे जाणले जाते. त्याला आत्मज्ञानाचे (ब्रह्मज्ञानाचे) फळ म्हणजे संसाराची अखंड (अ+विकळ) निवृत्ती, परमानंदाची तात्काळ प्राप्ती व मोक्षाचा सुकाळ (सुबत्ता) प्राप्त होतो. (ओ. १३४-१५४)

''आत्मा सूक्ष्मापेक्षाही सूक्ष्म व महानापेक्षाही महान आहे'', असे जे बोलणे ते फक्त त्याची सर्वव्यापकता बुद्धीला कळण्यासाठी (बुद्धि+गोचर करावया) असते. आत्मा सूक्ष्मही नव्हे व महानही नव्हे. येथील न्यूनाधिकता किंवा श्रेष्ठ-कनिष्ठता ठरविण्याचा (तारतम्य) भाव हा नुसता कल्पनेचा खेळ आहे. तो आत्मा तर ब्रह्मदेवापासून ते झुडुपा (लहान झाडा) पर्यंत (आ+ब्रह्म+स्तंबपर्यंत) सर्व चर (हालण्याचालणाऱ्या) व अचर (स्थिर किंवा न हलणाऱ्या) वस्तूंमध्ये भरलेला आहे. असे हे वर्णन करण्यास अशक्य (अनिर्वचनीय) आत्म्याचे अस्तित्व (सत्) बुद्धीत सामावून घेण्यासाठी (संकलित), वेदांती त्या अमर्यादितालाही वाचेने (शब्दांनी) मर्यादित करतात. केवळ बुद्धिवैभवाच्या योगाने आत्म्याचे खरे वर्म हाती लागत नसते. साधुसंतांच्या आणि सद्गुरुच्या संगतीने व त्यांच्या सेवेपासून होणाऱ्या कृपेने (अनुरागे) त्याची प्राप्ती होते. ब्रह्माचे सविस्तर वर्णन पोथ्या-पुस्तकांत काय थोडे रोकडे (तयार) भरलेले आहे! परंतु सद्गुरुकृपा जोवर होत नाही तोवर या जगाचा शेवट होईपर्यंतदेखील (कल्प+अंतीं) हा आत्मा हाताशी चढत नाही. नित्य (रोजचे संध्यापूजा वगैरे) व नैमित्तिक (श्राद्ध वगैरे प्रसंगाच्या निमित्ताने करण्याचे) कर्म करून जोपर्यंत मन शुद्ध संस्कारांनी युक्त होत नाही तोपर्यंत ब्रह्माचा अनुभव मुळीच लाभत नाही (ना+गवे). ब्रह्मच फक्त नित्य आहे व बाकी सर्व अनित्य आहे आणि जे जे सर्व दृष्टीस दिसते ते सतत टिकणारे नाही (दृश्य जाता नाही सातत्य), हे सत्य आहे. त्रिवार सत्य आहे. ब्रह्माचा वक्ताही (निरूपण करणारा) दुर्मिळ (मिळण्यास कठीण) तसाच श्रोताही (ते ऐकणाराही) दुर्लभ आणि प्रेमळ व अनुभवशील (प्रत्यक्ष अनुभवाने मिळालेले ज्ञान असलेला) सद्गुरु तर क्वचितच सापडेल. ब्रह्म काय वाटेवर (रस्त्यावर) पडले! जे योगी स्वत:ला पर्वताच्या गुहांमध्ये (गिरिकंदरी) कोंडून घेतात, यमनियमात (इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह यांत) बांधून घेतात व ध्यानधारणेत (योगाच्या सहाव्या व सातव्या पायऱ्यांत) गुंतवून घेतात, अशांनादेखील गुरुकृपा झाल्याशिवाय ब्रह्म दिसत नाही (येईना जे रूपा). ते तुझ्यासारख्या मूर्तिमंत लोभाला कसे बाबा लाभेल? ज्याला पैशाचा फार लोभ (उदंड द्रव्य+आसक्ति) असतो त्याला ब्रह्मज्ञानाची प्राप्ती कल्पांतीदेखील कधीही होत नसते, हे पक्के ध्यानात ठेवा (गांठ निश्चिती बांधावी). परमार्थाच्या गोष्टी ऐकताना विषयभोगांचे चिंतन व प्रपंचाचा सतत विचार (निदिध्यासन) करीत राहिले की साक्षात्कारण (आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव येणे) देखील तसेच (अर्धवट) मिळते. अंत:करणाला मल (राग, द्वेषादि विकार), विक्षेप (भ्रम किंवा मनाचा गोंधळ) आणि आवरण (आच्छादन किंवा दुर्बोधता) हे तीन दोष असतात. निष्काम (फलाची इच्छा न धरता केलेली) कर्मे करून मलाचे निर्मूलन होते व उपासनेने (पूजा-सेवा करून) विक्षेप धुऊन निघतो. अशाप्रकारे स्वकर्म आणि उपासना करून कर्त्याच्या चित्ताला परिपक्वता (पूर्णता) येते आणि मल व विक्षेप यांचा नाश होऊन फक्त आवरण शिल्लक राहते. हे सर्व अनर्थांचे बीज (ब्रह्मस्वरूपाला अज्ञानाने झाकून ठेवणारे) आवरण, ज्ञान प्रगट झाल्यावर, जसा सूर्य (रवि) उगवल्यावर अंधाराचा (तिमिराचा) नाश होतो, तसे नाश पावते. सत्य, ज्ञान, अनंत वगैरे लक्षणांनी ज्याचे वेदांतात निष्णात असलेल्या लोकांनी (विचक्षणी) वर्णन केले आहे ते हे ब्रह्म, ज्ञानी माणूस स्वस्वरूपी लीन झाला म्हणजे (त्याचा तोच होता) त्याच्या ठिकाणी प्रकाशते. थोडा अंधार व थोडे चांदणे असताना एकटा वाटसरू (पांथस्थ) जंगलात (रानात) चालत आत असताना शेंडा व फांद्या तुटलेल्या झाडाच्या खोडाला (स्थाणू) चोर (तस्कर) समजून भीतीने तेथेच लपतो. त्याला वाटते, ''मी एकटाच आहे व जवळ पैसा आहे. तो (चोर) तर वाटमाऱ्यासारखा टपून बसला आहे. आता विचार कसला करायचा? जीवाचा भरंवसा नाही.'' तोच दुरून दिव्याचा उजेड येतो व खोडाचे खरे स्वरूप (यथात्मता) प्रगट होते. वाटसरूची भीती नाहीशी होते (विरली तयाची भीतिग्रस्तता) आणि स्वत:ला झालेला चोराचा खोटा भास त्याला कळतो. (ओ. १५५-१७३)

असो. या ब्रह्माच्या प्राप्तीतील अडचणी (व्यत्यय) श्रोत्यांना सांगितल्या. पुढील अध्यायात श्रेयाची (कल्याणाची) इच्छा करणाऱ्याला श्रेय स्वत:चे रूप प्रगट करेल. हेमाड साईंच्या चरणी लोळण घेतो व तोंडात येईल ते बडबडतो (बरळे). साईकृपा जे जे बोलायला लावते (चावळे) ते भोळे भाविक ऐकोत. (ओ. १७४-१७५)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साई समर्थ यांच्या साईचरित्राचा **''ब्रह्मज्ञान कथन–१''** (जगाचे उत्पत्ती कारण व मूळ घटक असलेले जे ब्रह्म त्याचे व त्याच्या प्राप्तीच्या साधनांचे निरूपण नावाचा सोळावा अध्याय) संपूर्ण झाला.

**श्री सद्गुरु साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**

## अध्याय १७ वा

## ''ब्रह्मज्ञान कथन–२''

(जगाच्या उत्पत्तीचे कारण व मूळ घटक असलेले जे ब्रह्म त्याचे व त्याच्या प्राप्तीचे निरूपण. भाग २ रा)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरु साईनाथांना नमस्कार असो.

गेल्या अध्यायात वचन दिले होते की या अध्यायात श्रेय (परम कल्याणाचे साधन) व प्रेय (ऐहिक सुख भोगण्याचे साधन, जे सामान्य माणसांना प्रिय असते) यांच्या लक्षणांचे निरूपण होईल. ते आता काळजीपूर्वक ऐकावे. प्रकाश आणि अंध:कार यांच्या गुणधर्मांची घडण दिसायला जरी एकमेकांशी जोडलेली दिसली (अन्योन्य+वृत्ति+आकार) तरी ते जसे एकमेकांपासून भिन्न आहेत तसेच त्यांच्या गुणधर्मांची श्रेय व प्रेय घडणही एकमेकांशी जोडलेली दिसली तरी ते भिन्न आहेत. प्रेयाकडे ज्याचे मन धाव घेते तो स्वार्थापायी पतित होतो. श्रेय हे विवेकरूप (इष्टानिष्ट विचार करणारे, म्हणजे शहाणपणाचे) आहे व प्रेय अविवेकरूप (विचारशून्य, म्हणजे मूर्खपणाचे) आहे. श्रेयाचा विषय केवळ विद्या (ज्ञान) आणि प्रेयाचा निव्वळ अविद्या (अज्ञान किंवा चुकीची समजूत). प्रेय कधी शहाण्याला भुलवीत नाही व श्रेय अज्ञानी लोकांना आवडत नाही. जोवर कनक (सोने) व कामिनी (स्त्री) यांची ओढ आहे, इंद्रियांना विषयांची आवड आहे आणि विवेक (नित्यानित्याचा विचार) व वैराग्य (ऐहिक सुखांबद्दल अनासक्ती) संपादिले नाही, तोवर प्रेयच (ऐहिक सुखे भोगणेच) गोड वाटत असते. जसे पाणी व दूध (नीर+क्षीर) एकत्र मिसळलेले असते तसेच प्रेय व श्रेयही एकत्र गुंतलेले (भेसळ) असतात. जसे मानस सरोवरातील हंस (मराळ मानसी) दूधच तेवढे वेगळे करून पितात तसे दृढनिश्चयी, बुद्धिमान, विवेकी व भाग्यवान माणसे श्रेयाकडेच आसक्त (लोलंगत) असतात व प्रेयापासून सदा तोंड फिरवितात (विन्मुख); परंतु तेच मंदबुद्धी लोक पहा! शरीर, पशु, पुत्र, धन, मोठेपणा (मान) इत्यादींच्या योगक्षेमाच्या (आहे ते सुरक्षित ठेवण्याच्या आणि नाही ते अधिकाधिक मिळविण्याच्या) नादी लागून एकटे प्रेयच तेवढे साधतात. (पहा कठोपनिषद, अ. १, वल्ली २, मंत्र २, **श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतस्तौ सम्परीत्य विविनक्ति धीरः। श्रेयो हि धीरोऽभि प्रेयसो वृणीते, प्रेयो मन्दो योगक्षेमाद् वृणीते॥** श्रेय आणि प्रेय ही दोन्ही मनुष्याच्या समोर येतात. बुद्धिमान मनुष्य त्या दोन्हींच्या गुणदोषांचा नीट विचार करून दोन्हींना वेगवेगळे समजून घेऊन तो श्रेष्ठबुद्धी मनुष्य प्रेयापेक्षा श्रेयालाच श्रेष्ठ समजून त्याचाच, म्हणजे श्रेयाचाच स्वीकार करतो; परंतु मंदबुद्धीचा माणूस लौकिक योगक्षेमाच्या इच्छेने प्रेयाला जवळ करतो.) श्रेय काय आणि प्रेय काय, ही दोन्ही जरी जाणली तरी मनुष्यप्राणी बुद्धीने स्वतंत्र (स्वायत्त) असल्याने त्यालाच त्या दोन्हीतून कोणते पसंत करावयाचे (ग्रहण+व्यवसाय), हे ठरवायचे असते. दोन्ही पुढे असल्यावर मनुष्याला त्यांची निवड करणे अवघड असते, कारण त्याच्या मंदबुद्धीवर विजय मिळवून प्रेयच त्याला चिकटते (आलिंगी तयाते). दुधात (पय) पाणी (तोय) मिसळलेले असले तरी हंस जसा दूधच (पयच) तेवढे घेतो तसे प्रेय बाजूला सारून श्रेयाचा स्वीकार करणे (आदरू) हाच तो पुरुषार्थ (मानवी आयुष्यातील साध्य करण्याची गोष्ट) होय! श्रेय आणि प्रेय ही दोन्ही जरी पुरुषाच्या स्वाधीन (इच्छेप्रमाणे वागणारी) असली तरी विवेकहीन मंदमति पुरुष यांचा उहापोह (योग्यायोग्य विचार) करण्यास समर्थ नसतो. (आपले) श्रेय (कल्याण) कशात आहे, हे प्रथम निश्चित जाणले पाहिजे. नंतर त्याच्या मार्गात जे अडथळे (प्रतिबंध) येतील त्यांचे संपूर्णपणे (स+आदि+अंत) निवारण करण्याचे उपाय योजिले पाहिजेत. येथेच पुरुषार्थ (मानवी प्रयत्न) दृष्टीपुढे दत्त म्हणून ठामपणे उभा राहतो (ठाके निधडा). म्हणून बुद्धीचा पक्का निश्चय (धडा) करून श्रेय प्राप्त करण्यासाठीच नेटाने प्रयत्न करा. (ओ. १-१४)

संसारचक्राचे भ्रमण अतर्क्य आहे. ते अखंड अष्टौप्रहर (रात्रंदिवस) फिरत असते. त्यात माणूस आध्यात्मिक (मनापासून होणारे, म्हणजे ताप येणे, हाड मोडणे, क्रोध, चिंता वगैरेमुळे दुःखी होणे वगैरे), आधिभौतिक (पंचमहाभूतांपासून होणारे, म्हणजे चोर, साप वगैरे) व आधिदैविक (देवांपासून होणारे, म्हणजे अतिवृष्टी, दुष्काळ वगैरे) अशा तीन प्रकारची भयंकर (प्रखर) व निवारण्यास कठीण दुःखे (त्रिताप) सहन करीत असतो. मग अत्यंत दुःखाचा अतिरेक (कहर) सहन करून गांजलेला (जर्जर) तो ते निवारण्याची सोपी सुखकर साधने शोधू लागतो. संसारचक्राचे हे भ्रमण (परिवर्तन) सहन करायला कठीण आहे. हे कसे थांबविले जाईल (स्तंभन)? त्यासाठी काही उपाय असेल का? याचा शोध (अन्वेषण) तो करू लागतो. महाभाग्याने अशी बुद्धी उपजली की तेथून पुरुषार्थाचा (मानवी प्रयत्नांचा) उदय होतो आणि मग तो पुरुष आपल्या हिताचे योग्य उपाय साधणारा होतो. अनादि (जिला आरंभ नाही) अशी ही अविद्या (अज्ञान) किंवा माया (ईश्वराची मोह घालणारी शक्ती) शिंपल्यावरच्या रुप्या (चांदी) सारखी व मृगजळातील पाण्यासारखी निकामी (वाया) आहे. तिच्या खोटचा आभासरूप (अध्यास+रूप) मोठ्या अडथळ्यांचा (महद्+अंतराय) नाश केला पाहिजे. स्वप्नात सोन्याच्या गारांचा (बर्फाच्या खड्यांचा) पाऊस पडतो. वेळी कामास येतील असे वाटून त्या प्रयत्नपूर्वक पुष्कळ (अमिती) साठवून ठेवल्या तरी जागे झाल्यावर त्या हरवून जातात.

अनुभवलेल्या व न अनुभवलेल्या (दृष्ट+अदृष्ट) विषयभोगांची वासना असणे किंवा आशा, उत्कंठा (तृष्णा) वा इच्छा (कामना) असणे, हे सर्व अडथळे (प्रतिबंधक) आहेत, हे जाणून त्यांना आधी मूळासकट खणून काढा. जे सूर्यप्रकाशाने (सूर्य+करें) दिसण्यास अशक्य, जेथून बुद्धी माघारी फिरते व जेथे वेदांचे व श्रुतींचे (उपनिषदांचे) पाऊलही शिरत नाही (वर्णन करता येत नाही. 'नेति (न+इति) नेति' ते असे नव्हे, ते असे नव्हे, म्हणून वर्णन करणे सोडून देतात), ते गुरु स्वत: दाखवितो (निजकरें दावी). काम व क्रोध ह्या दोन वृत्ती ज्ञानाची प्राप्ती करू देत नाहीत. श्रवण, मनन व समाधी यांना त्या हातोहात तोडतात (विच्छित्ति). दिव्याची ज्योत व कापूर (दीप+कर्पूर) यांचा समागम (लगटी) झाला की एकमेकांची लोटालोटी शक्य